- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...

- दैनिक सिंहवाणी वृत्त -

९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, ३ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २०४ | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६

# एसआयटी घेणार चार्टर्ड अकाउंटंटची मदत; ५ वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची झाडाझडती

## श्रीराम मंदिर देणगी घोटाळा प्रकरण

**वृत्तसंस्था, अयोध्या**

अयोध्या येथील भव्य श्रीराम मंदिरातील चंदा आणि चढावा चोरी प्रकरणाच्या चौकशीला आता अत्यंत वेग आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने आता तपासात चार्टर्ड अकाउंटंट म्हणजेच सनदी लेखापालांची मदत घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

हा तपास ज्या वळणावर येऊन पोहोचला आहे, तिथे राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांच्या भूमिकेबाबतचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी एसआयटीने आता थेट श्रीराम मंदिर ट्रस्टचे ऑडिट रेकॉर्ड्स, बँक खात्यांचे दस्तावेज आणि गेल्या पाच वर्षांतील सर्व आर्थिक व्यवहारांची कसून तपासणी सुरू केली आहे. मंदिरातील दान गोळा करण्याची नेमकी प्रक्रिया काय आहे, तसेच सुरक्षिततेसाठी लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजचाही सखोल अभ्यास केला जात आहे. आर्थिक

## घोटाळ्यातील नेमकी रक्कम येईल पुढे

गैरव्यवहार नेमका कसा आणि कोणत्या स्तरावर झाला, हे तांत्रिकदृष्ट्या सिद्ध करण्यासाठीच आता सीएची मदत घेतली जात आहे.

या तपासादरम्यान एसआयटीने चंपत राय, डॉ. अनिल मिश्रा आणि गोपाळ राव यांची स्वतंत्रपणे आणि सविस्तर चौकशी केली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या चौकशीदरम्यान चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी या चोरीच्या प्रकरणाशी आपला कोणताही थेट संबंध नसल्याचे सांगत या संपूर्ण घोटाळ्यात आपली कोणतीही भूमिका नसल्याचा स्पष्ट इन्कार केला आहे. त्यांनी चौकशीत स्वतःला निर्दोष सांगितले असले, तरी त्यांच्या या दाव्यांमुळे आणि इन्कारामुळे तपास यंत्रणांसमोर या प्रकरणाचा सस्पेन्स आणखी वाढला असून, गुंतागुंत अधिक वाढली आहे.

यापूर्वी या घोटाळ्याची प्राथमिक अहवाल समोर आल्यानंतर चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी नैतिकतेच्या आधारावर आपापल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. मात्र, ट्रस्टच्या नियमांनुसार आणि



बायलॉजनुसार, त्यांचे राजीनामे अद्याप अधिकृतपणे मंजूर झालेले नाहीत. राजीनामा स्वीकारण्यासाठी ट्रस्टच्या दोन-तिहाई सदस्यांचा होकार आणि बहुमत असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आगामी ६ जुलै रोजी अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची एक अत्यंत महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीत त्यांच्या राजीनाम्यावर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाची दखल घेत निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार एसआयटीने आत्तापर्यंत या प्रकरणात तब्बल आठ जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून लाखो रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे.

रोख रक्कम मोजताना आणि बँकेत जमा करताना झालेल्या या घोटाळ्यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. आता सीएच्या प्रवेशामुळे ट्रस्टच्या अंतर्गत खात्यांचे पुनरपरीक्षण केले जाणार असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणातील मोठे सत्य समोर येण्याची शक्यता वर्तवली जात

## थोडक्यात

### येत्या १५ दिवसांत पीएफ खात्यात येणार व्याज

**नवी दिल्ली :** केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने ७ कोटी खातेधारांसाठी आनंदवार्ता आणली आहे. ईपीएफओ उद्यापासून कर्मचाऱ्यांच्या भविष्य निधी खात्यात व्याजाची रक्कम जमा करणार आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी केंद्र सरकारने ८.२५ टक्के व्याजदर निश्चित केला आहे. माहितीनुसार, पुढील १५ दिवसांच्या आता कोट्यवधी सदस्यांच्या सक्रिय खात्यात व्याजाची रक्कम जमा होणार आहे. कर्मचाऱ्यांना हा मोठा दिलासा आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांना पीएफ खात्यात व्याजाची रक्कम येण्याची प्रतिक्षा होती. व्याज जमा झाल्यानंतर खातेदार ईपीएफ पासबुकमध्ये वाढलेली रक्कम तपासू शकतात. मोदी सरकारने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी ८.२५ टक्के व्याजदर देण्याचे ठरवले. वित्त मंत्रालयाने ईपीएफओने निश्चित केलेल्या ८.२५ टक्के व्याजदराला मंजूरी दिली. आता उद्यापासून ईपीएफओ सदस्यांच्या बँक खात्यात व्याजाची रक्कम जमा होणार आहे.

### बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळली

मुसळधार पावसामुळे उत्तराखंडमध्ये कहर केला आहे. राज्यात नद्यांना पूर आला आहे. भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. बद्रीनाथ महामार्ग अनेक ठिकाणी बंद करण्यात आला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ऋषिकेशमध्ये रिव्हर राफ्टिंगवरही बंदी घालण्यात आली आहे. बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळल्याने शेकडोच्या संख्येने भाविक अडकले आहेत. बद्रीनाथकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळल्याने महाराष्ट्रातल्या भाविकांचा सुद्धा खोळंबा झाला.

# तत्कालीन ठाणेदारासह ९ पोलिसांना जन्मठेप

## कोठडीत मारहाण व मृत्यू प्रकरण भोवले

### पोलिसांचे क्रौर्य, न्यायालयाने दिला न्याय

**दै. सिंहवाणी वृत्त, अकोला**

पोलीस कोठडीत असलेल्या आरोपीचा मारहाणीत मृत्यू झाल्याप्रकरणी वाशिम जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक निकाल दिला आहे. न्यायालयाने रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह नऊ पोलीस कर्मचाऱ्यांना दोषी ठरवत थेट जन्मठेपेची कडक शिक्षा सुनावली आहे.

तब्बल १५ वर्षांपूर्वी १० मे २०११ रोजी घडलेल्या या अत्यंत गंभीर घटनेनंतर प्रदीर्घ कायदेशीर लढाई लढून अखेर पीडित पारधी कुटुंबाला न्याय मिळाला आहे. या मोठ्या निकालामुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे ज्यावेळी ही दुर्दैवी घटना घडली होती, तेव्हा पोलिसांनी पीडित तरुणाच्या आई-वडिलांची साधी तक्रार घेण्यासही नकार दिला होता.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, वाशिम जिल्ह्यातील रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे यांच्यासह नऊ पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने ९ मे २०११ रोजी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील वाढोणा येथील पारधी वस्तीवर रात्रीच्या वेळी अचानक धाड टाकली होती.

या कारवाई दरम्यान पोलिसांनी बेग्या पवार या तरुणाला चोरीच्या एका गुन्ह्यात संशयित म्हणून घरातून ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्याला रिसोड पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवण्यात आले. संशयित गुन्ह्याची कबुली मिळवण्यासाठी पोलिसांनी बेग्या पवार याला पोलीस कोठडीत अमानुष आणि बेदम मारहाण केली. पोलिसांच्या या जबर मारहाणीमुळे बेग्या पवारची प्रकृती अत्यंत खालावली आणि त्यातच १० मे २०११ रोजी त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला.

पोलिसांच्या ताब्यात असताना एका तरुणाचा अशा प्रकारे संशयास्पद मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या अन्यायकारक घटनेविरोधात सर्व स्तरांतून तीव्र रोष व्यक्त करण्यात आला होता, तसेच दोषी पोलिसांवर कारवाईसाठी मोठी आंदोलने आणि मोर्चे काढण्यात आले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अखेर या



प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे म्हणजेच सीआयडीकडे सोपवण्यात आला. सीआयडीच्या पथकाने या प्रकरणाचा अत्यंत सखोल तपास केला आणि दोषी पोलिसांविरुद्ध हत्येच्या गुन्ह्यासह विशेष ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत न्यायालयात भक्कम आरोपपत्र दाखल केले.

वाशिम जिल्हा सत्र न्यायालयात या खटल्याची प्रदीर्घ काळ सुनावणी चालली. यादरम्यान न्यायालयाने सर्व साक्षीदार, वैद्यकीय अहवाल आणि पुरावे अत्यंत बारकाईने तपासले. अखेर सर्व पुरावे सिद्ध झाल्यानंतर न्यायालयाने तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह पोलीस कर्मचारी मदन केशव पवार, शिवाजी नामदेव खिल्लारी, पंजाब माणिकराव पाटकर, रमेश सीताराम पवार, प्रकाश हिरालाल तारम, नागोराव भगवान खांडके, अशोक निवृत्ती वैद्य आणि वसंत कणिराम जाधव या नऊ जणांना बेग्या पवारच्या मृत्यूस कारणीभूत आणि दोषी धरत जन्मठेपेची कडक शिक्षा सुनावली.

न्यायालयाच्या या ऐतिहासिक निकालानंतर बेग्या पवार यांच्या वृद्ध माता-पित्यांनी आणि कुटुंबीयांनी अत्यंत भावूक होत समाधान व्यक्त केले आहे. आमच्या मुलावर पूर्वी कधीही कोणताही गुन्हा दाखल नव्हता आणि तो पूर्णपणे निर्दोष होता, केवळ तो पारधी समाजाचा असल्यामुळे पोलिसांनी त्याला या प्रकरणात बळजबरीने अडकवण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा जीव घेतला, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. १५ वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर अखेर न्याय मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या प्रकरणात पीडित पारधी कुटुंबाच्या बाजूने सरकारी वकील ॲडव्होकेट श्रीराम काळू यांनी न्यायालयात अतिशय प्रभावीपणे बाजू मांडली.

# कामठीत महिलेची हत्या तर भांडेवाडीत युवकाचा केला गेम

### दोन हत्येने हादरले नागपूर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उपराजधानी नागपुरात काही तासांच्या अंतराने घडलेल्या दोन हत्यांच्या घटनांनी संपूर्ण शहर हादरले आहे. एका प्रकरणात पतीने पत्नीची हत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, तर दुसऱ्या घटनेत भांडेवाडी परिसरात एका युवकाची निर्घृण हत्या करण्यात आली. या सलग घडलेल्या घटनांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पहिली घटना नवीन कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाडा शिरपूर रोड येथे उघडकीस आली. रस्त्याच्या कडेला एका महिलेचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळून आला. तिच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या अनेक जखमा आढळल्या आहेत. प्राथमिक तपासात महिलेची अन्यत्र हत्या करून मृतदेह घटनास्थळी आणून टाकण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, या



प्रकरणात पतीनेच पत्नीची हत्या केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, याबाबत पोलिसांनी अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी केलेली नसून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.

दरम्यान, दुसरी घटना भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हनुमान नगर येथे घडली. गणेश प्रितमलाल बोरकर या युवकाची अज्ञातांनी हत्या केली. स्थानिक पातळीवर तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याची चर्चा असली, तरी हत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.दोन्ही घटनांची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि संबंधित पोलीस ठाण्यांची पथके घटनास्थळी दाखल झाली. घटनास्थळावरून पुरावे संकलित करण्यात आले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. तसेच संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

अवघ्या काही तासांच्या अंतराने झालेल्या या दोन हत्यांमुळे नागपूरकरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही प्रकरणांचा सखोल तपास सुरू असून, तपासानंतरच हत्यांमागील नेमके कारण आणि आरोपींबाबत अधिकृत माहिती समोर येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.




# शेतीकामासाठी गाळ, मुरूमावरील रॉयल्टी रद्द!

## शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई, विहीर, गोठ्यासाठी गौण खनिज 'फ्री'!,महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा, शासन निर्णय जारी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**



बळीराजाला आता स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरूमासारख्या गौण खनिजांसाठी शासनाला एक रुपयाचीही रॉयल्टी (स्वामित्व धन) द्यावी लागणार नाही. इतकेच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर किंवा बैलगाड्या अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी ऐतिहासिक घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली.

सभागृहातील आमदार संजय पुराम, अभिमन्यु पवार, गोपीचंद पडळकर, रत्नाकर गुट्टे, आशिष देशमुख, संतोष दानवे, सतीश देशमुख, नारायण कुचे, राजकुमार बडोले, आशिष जयसवाल, नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांनी सातत्याने मांडलेल्या मागण्यांची दखल घेत शासनाने हा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, घोषणेनंतर लगेच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**शेती सुधारणेला बळ**

राज्याची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने ग्रामीण भागाचा विकास जलद गतीने व्हावा, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलकुंभ, गावतळी, शेततळी, पाझर तलाव, गाव नाले, महसुली नाले, बंधारे, मालगुजारी तलाव, लघुसिंचन तलाव किंवा स्वतःच्या शेतातून गाळ, माती व मुरूम काढण्यास आता पूर्ण मुभा असेल. पावसाळ्यात शेतात आणि शेतरस्त्यांवर होणारा चिखल दूर करणे, खड्डे भरणे, विहीर खणणे, जनावरांचा गोठा बांधणे आणि शेतघर दुरुस्तीसाठी या गौण खनिजाचा थेट वापर करता येईल.

**अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत परवानगी बंधनकारक**

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्याला केवळ स्थानिक तलाठ्याकडे एक साधा अर्ज करावा लागेल. संबंधित मंडळ अधिकाऱ्याने अर्जावर १५ दिवसांच्या आत परवानगी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तलाव किंवा नाले जलसंधारण विभागाचे असतील तर त्या विभागाचे आणि महसुली नाले असल्यास तहसीलदारांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

"शेतकऱ्यांनी स्वतःच्या वापरासाठी माती-मुरूम नेल्यास ट्रॅक्टर, ट्रक किंवा बैलगाडी कुठलेही तहसीलदार किंवा पोलीस पकडणार नाहीत. त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. जर कोणत्याही अधिकाऱ्याने शेतकऱ्याला नाहक त्रास दिला, तर सरकार त्यांच्यावर कठोर पावले उचलेल, हा निर्णय केवळ आणि केवळ शेतकऱ्यांच्या वैयक्तिक व शेतीकामाच्या कल्याणासाठी घेण्यात आला आहे. या सवलतीचा कोणताही व्यावसायिक गैरवापर करता येणार नाही. व्यावसायिक वापर आढळल्यास मात्र प्रचलित कायद्यानुसार कारवाई केली जाईल.

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र**

संपादकीय लेखणीतून...

## चिखल आणि नवनिर्माण कला!

चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन- ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो.

छी, छी, छीऽऽऽ..! चिखल हे एक उपद्रव वाटत आहे, नाही का? पाऊस पडताच सर्वत्र चिखल होतो आणि अक्षरशः सर्वत्र चिखल होतो. या निसरड्या, चिकट घाणेरड्या पदार्थाचे कोणतेही फायदे नक्कीच नाहीत, बरोबर? चुकीचे. आणि आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचे निमार्ते ते सिद्ध करण्यासाठी बाहेर आहेत! शेवटी, चिखल हा घराबाहेरील भागांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे आणि घराबाहेर म्हणजे ताजी हवा आणि व्यायाम, लोकांसाठी दोन सर्वोत्तम गोष्टी. आणि म्हणून जर आपण थोडे घाण झालो तर? बऱ्याच संशोधनातून असे दिसून आले आहे की विशिष्ट प्रमाणात जीवाणूंच्या संपर्कात येणे आपल्यासाठी चांगले आहे, कारण ते रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, अक्षरशः निर्जंतुक वातावरणात राहण्याऐवजी, ज्यामुळे आपले शरीर खूप असुरक्षित होते. किती खनिजे चिखल करू शकतात हे सांगायला नको - लोक मड मास्क आणि स्पामध्ये आंघोळीसाठी शेकडो डॉलर्स देण्याचे एक कारण आहे. मग आपण कशाची वाट पाहत आहात? चला घाण करूया! कारण, आजीवन आपली चिखलाशी नाळ घट्ट जोडली आहे. संत तर सांगतात, की

"मातीची रे काया तुझी;
अंती मातीमंदी जायाची ॥"

अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ ल्यूथर बरबँक यांनी म्हटले आहे, "प्रत्येक मुलाकडे मातीचे पाईप, तृणधान्य, पाण्यातील बग, टॅडपोल, बेडूक, मातीची कासवे, जंगली स्ट्रॉबेरी, एकोर्न, चेस्टनट, झाडे चढण्यासाठी असावीत. वेडसाठी ब्रूक्सह्मधमाश्या, फुलपाखरे, पाळीव प्राण्यांसाठी विविध प्राणी, गवताचे मैदान, पाइन-शंकू, खडक ते टोल, वाळू, साप आणि हॉर्नेट; यापासून वंचित राहिलेले कोणतेही मूल...शिक्षणाच्या सर्वोत्तम भागापासून वंचित राहिले आहे."

आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचा इतिहास असा, की आंतरराष्ट्रीय चिखल दिवसाच्या निर्मात्यांना पृथ्वीवरील सर्व मुलांना एकमेकांच्या जवळ जाण्यास मदत करण्यासाठी एक मार्ग शोधायचा होता आणि पृथ्वीद्वारेच ते करण्याचा यापेक्षा चांगला मार्ग कोणता? आंतरराष्ट्रीय चिखल दिन सन २००९मध्ये एका जागतिक मंचाच्या कार्यक्रमात सुरू झाला, जेव्हा ऑस्ट्रेलियातील गिलियन मॅकऑलिफ आणि नेपाळमधील बिष्णू भट्टा समुदायाच्या भावनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आपल्या सभोवतालच्या जगाबद्दल कौतुक करण्याच्या मार्गांबद्दल बोलण्यासाठी एकत्र आले. त्यानंतरच्या सहकार्याने हॉलंड ते नेपाळ ते युनायटेड स्टेट्स पर्यंत जगभरातील शिक्षक, मुले आणि कुटुंबांना दरवर्षी २९ जून रोजी एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्यासाठी प्रेरित केले. वय, वंश आणि धर्म याची पर्वा न करता, चिखलात झाकलेले, आम्ही सर्व एकसारखे दिसतो!

आंतरराष्ट्रीय चिखल दिवस कसा साजरा करायचा? तर आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्याचे असंख्य मार्ग आहेत, परंतु त्या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे, तुम्हाला घाण करावी लागेल. जर तुमची मुले असतील तर हा दिवस विशेषतः मजेदार असू शकतो, कारण मुलांइतके गलिच्छ होणे कोणाला आवडते? आंतरराष्ट्रीय चिखल दिनानिमित्त सर्वात सर्जनशील आणि मजेदार क्रियाकलापांपैकी एक म्हणजे मातीची शिल्पे किंवा मड केक बनवणे. थोडे अधिक माती किंवा पाणी घालून तुम्ही वापरत असलेल्या चिखलाची सुसंगतता समायोजित करणे सोपे आहे, त्यामुळे प्रक्रियेत भरपूर निश्चिंत हास्य आणि दर्जेदार कौटुंबिक वेळेचा आनंद घेताना तुम्हाला जे बनवायचे आहे ते बनवणे सोपे असावे. या दिवसाचा पूर्ण आनंद लुटण्याचा आणखी एक सोपा मार्ग म्हणजे ब्लो-अप पूल वापरून घरगुती मातीचा खड्डा बनवणे. हे केवळ स्वस्तच नाही तर खरोखरच एक अनोखा अनुभव देखील देते. एकदा तुम्ही एक छोटासा ब्लो-अप पूल विकत घेतल्यावर तुम्हाला फक्त ते मातीने भरावे लागेल जे माती आणि पाण्याचे मिश्रण वापरून सहज भरता येईल जे तुमची मुले नंतर पसरू शकतात. फक्त तुम्ही तयार आहात याची खात्री करा. तुमचे कपडे सोलून काढल्यावर फेकून द्या, कारण ते कपडे पुन्हा स्वच्छ होतील असा कोणताही मार्ग नाही. चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन- ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो.

# प्लास्टिक एक सोय आहे, पण ते अनमोल जीवनापेक्षा महत्त्वाचे नाही

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन विशेष



डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

निसर्ग आणि सजीवसृष्टी हे एकमेकांचे पूरक आहेत. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या, संशोधनाच्या आणि तांत्रिक प्रगतीच्या बळावर जीवन अधिक सोयीस्कर करण्यासाठी अनेक उपयुक्त वस्तूंची निर्मिती केली. या शोधांमुळे मानवी जीवन निश्चितच अधिक सुलभ झाले, परंतु वाढत्या भौतिक गरजा आणि स्वार्थामुळे मानवाला निसर्गाचे अंधाधुंद शोषण करण्याची प्रवृत्तीही वाढली. परिणामी, जी साधने एकेकाळी सोयीची मानली जात होती, तीच आज मानव आणि पर्यावरणासाठी गंभीर संकटाचे कारण ठरत आहेत. प्लास्टिक हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आज परिस्थिती इतकी चिंताजनक झाली आहे की, आपल्याला मृत्यूसाठी कोणत्याही शस्त्राची गरज उरलेली नाही. आपणच निर्माण केलेले प्रदूषण, भेसळ, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर आणि प्लास्टिकचा अनियंत्रित वापर यांमुळे अनेक गंभीर आजार उद्भवत असून अकाली मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. प्लास्टिकने केवळ पर्यावरणालाच नाही, तर मानवी आरोग्यालाही गंभीरपणे प्रभावित केले आहे.

प्लास्टिकची सर्वात मोठी समस्या म्हणजे ते नैसर्गिकरीत्या अतिशय दीर्घकाळ नष्ट होत नाही. एकदा वापरल्यानंतर ते शेकडो नव्हे, तर जवळपास हजार वर्षांपर्यंत पर्यावरणात टिकून राहू शकते. कालांतराने ते विघटित होऊन मायक्रोप्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिकमध्ये रूपांतरित होते. हे सूक्ष्म कण माती, पाणी आणि हवेच्या माध्यमातून संपूर्ण अन्नसाखळीत प्रवेश करतात. वैज्ञानिक संशोधनांमध्ये मानवी मेंदू, रक्त, फुफ्फुसे, गर्भातील बाळ तसेच विविध सजीवांच्या शरीरातही प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळल्याची पुष्टी झाली आहे. ही बाब भविष्यासाठी अत्यंत गंभीर इशारा आहे.

आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दररोज अन्न आणि पाण्यासोबत प्लास्टिकचे सूक्ष्म कण शरीरात घेत आहोत. प्लास्टिकचा कचरा पचवता येत नाही. अनेक प्राणी आणि पक्षी प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर प्लास्टिक वस्तू अन्न समजून गिळतात, त्यामुळे त्यांचा मृत्यूही होतो. नद्या, समुद्र आणि जंगलेही प्लास्टिक प्रदूषणामुळे सातत्याने प्रभावित होत आहेत. प्लास्टिक जाळल्यावर निर्माण होणारे विषारी वायू हवेचे प्रदूषण वाढवतात, तर जमिनीत पडून राहिलेल्या प्लास्टिक मधून निर्माण होणारे वायू हवामान बदल आणि जैवविविधतेसाठी धोकादायक ठरत आहेत. प्लास्टिकमध्ये असलेली रासायनिक द्रव्ये हार्मोन्सचे असंतुलन, प्रजननाशी संबंधित समस्या, हृदयविकार, थायरॉईडचे विकार, मधुमेह, श्वसनाचे आजार तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढवतात. प्लास्टिक उद्योगात काम करणाऱ्या कामगारांमध्ये फुफ्फुसांच्या आजारांचे प्रमाणही अधिक आढळते. त्यामुळे प्लास्टिक प्रदूषण ही आता केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, ती जागतिक सार्वजनिक आरोग्य संकट बनली आहे.

दरवर्षी ३ जुलै रोजी संपूर्ण जगात "आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन" साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांना एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करणे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. हा दिवस केवळ प्रतीकात्मक नसून पृथ्वी, पर्यावरण आणि भावी पिढ्यांचे संरक्षण करण्यासाठीचा जागतिक उपक्रम आहे. जर आपण आजच प्लास्टिकवरील अवलंबित्व कमी केले नाही, तर भविष्यात त्याचे परिणाम अधिक भयावह स्वरूप धारण करू शकतात.

भारतात दरवर्षी सुमारे ५.५ दशलक्ष टन सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण होतो. सरासरी प्रत्येक भारतीय नागरिक वर्षभरात सुमारे ११ किलोग्रॅम प्लास्टिकचा वापर करतो. यामध्ये कॅरी बॅग, पॅकेजिंग साहित्य आणि दैनंदिन वापरातील इतर प्लास्टिक वस्तूंचा समावेश असतो. यापैकी जवळपास ४ किलोग्रॅम प्लास्टिक हे केवळ सिंगल-यूज प्लास्टिक असते. देशात निर्माण होणाऱ्या सुमारे ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचऱ्यापैकी ४३ टक्क्यांहून अधिक भाग सिंगल-यूज प्लास्टिकचा आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे यापैकी जवळपास १९ टक्के प्लास्टिक कचरा संकलितही होत नाही आणि तो उघड्यावर विखुरला जाऊन माती, जलस्त्रोत आणि वन्यजीवांना मोठे नुकसान पोहोचवतो. चीन आणि अमेरिकेनंतर भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण करणारा देश आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने अनेक नियम लागू केले असले तरी अनेक ठिकाणी बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर आजही सुरू आहे. दक्षिण आशियात सर्वाधिक घनकचरा निर्माण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखला जाऊ लागला आहे. दुसरीकडे, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांसाठी प्रसिद्ध असलेल्या केरळमध्येही दरवर्षी १,३०,००० टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो, त्यापैकी केवळ सुमारे ३ टक्के कचऱ्याचेच पुनर्चक्रण केले जाते.

आपल्या देशातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे पर्यावरणाबाबत वाढत चाललेली निष्काळजी वृत्ती आणि बेफिकिरी. फारच कमी लोक एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न करतात, तर बहुतेक लोक विचार न करता इतरांचे अनुकरण करत राहतात. जेव्हा वैयक्तिक सोयीला सामाजिक आणि पर्यावरणीय हितापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते, तेव्हा त्याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला आणि भावी पिढ्यांना भोगावे लागतात. प्लास्टिक प्रदूषण हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आजही बंदी लागू असतानाही बाजारपेठांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांचा सर्रास वापर होताना दिसतो. अनेक वेळा दुकानदार नकार देतात, तरीही ग्राहक स्वतः प्लास्टिकच्या पिशव्यांची मागणी करतात. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही, तर पर्यावरण आणि मानवी आरोग्याविषयीच्या आपल्या बेजबाबदार मानसिकतेचेही द्योतक आहे. त्याचप्रमाणे, रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याची सवय हळूहळू मोठ्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये रूपांतरित होते. अशा प्रकाराला विरोध केला किंवा रोखण्याचा प्रयत्न केला, तर अनेकदा वाद निर्माण होतात.

पूर्वी गंभीर आजार प्रामुख्याने व्यसनाधीनता किंवा चुकीच्या जीवनशैलीमुळे होत असत. परंतु आता प्रदूषण आणि पर्यावरणाविषयीची निष्काळजी वृत्ती यांमुळे लहान मुले, निरोगी व्यक्ती आणि कोणतेही व्यसन नसलेले लोकही गंभीर आजारांना बळी पडत आहेत. दुभती जनावरे प्लास्टिकच्या पिशव्या गिळतात, सागरी जीव प्लास्टिकच्या कचऱ्यात अडकतात आणि पक्षी प्लास्टिकला अन्न समजून खातात. त्यानंतर या प्राण्यांचे दूध, मांस किंवा इतर उत्पादने मानवी आहाराचा भाग बनतात आणि अशा प्रकारे प्लास्टिकचे सूक्ष्म कण आपल्या अन्नसाखळीत प्रवेश करतात. आज बाजारात जवळपास सर्व प्रकारची प्लास्टिकची भांडी उपलब्ध आहेत. विशेषतः गरम अन्न आणि गरम पेयांसाठी प्लास्टिकचा वापर आरोग्यासाठी अत्यंत घातक मानला जातो, कारण प्लास्टिक मधील हानिकारक रसायने अन्नामध्ये मिसळू शकतात. त्यामुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. आज देशातील जवळपास प्रत्येक गल्ली, परिसर, नातेवाईक किंवा परिचितांमध्ये कर्करोगाचा एखादा रुग्ण आढळतो, ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

जर आपल्याला आपला देश, समाज आणि पर्यावरण सुरक्षित ठेवायचे असेल, तर बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकार किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे, सिंगल-यूज प्लास्टिक टाळणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि पर्यावरणविषयक कायद्यांचे काटेकोर पालन करणे या गोष्टी आपल्या दैनंदिन सवयींचा भाग व्हायला हव्यात. निसर्ग आपल्याला शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि जीवनासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधने विनामूल्य उपलब्ध करून देतो.

त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे. जर आपण आज जागरूक झालो नाही, तर त्याची मोठी किंमत भावी पिढ्यांना मोजावी लागेल. प्लास्टिक हे केवळ एक सोयीचे साधन आहे; परंतु मानवी जीवन आणि पर्यावरण त्यापेक्षा कितीतरी अधिक मौल्यवान आहेत. जीवन एकदाच मिळते, त्याचे महत्त्व ओळखा. प्रदूषणाच्या माध्यमातून स्वतःसह इतरांच्या जीवनालाही धोका निर्माण करणे हे अयोग्यच नव्हे, तर गंभीर गुन्हा आहे. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवीमुक्त दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी असा संकल्प करूया की, प्लास्टिकवरील आपले अवलंबित्व कमी करू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, निरोगी तसेच सुरक्षित भविष्य घडविण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवू.

- ०८२३७४ १७०४१

# गणितातील स्थिरांकाला टाऊ समर्पित

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

गणिती "Tau Day" (टाऊ डे) दरवर्षी २८ जून रोजी साजरा केला जातो. हे गणितातील "टाऊ" (३) या स्थिरांकाला समर्पित आहे, ज्याचे मूल्य पाय (स्र) च्या नेमके दुप्पट म्हणजे अंदाजे ६.२८ असते. 'Tau Day' बद्दल महत्त्वाची माहिती- अथः गणितामध्ये स्र (पाई) चे मूल्य वतुर्ळाचा परीघ आणि व्यासाचे गुणोत्तर मानले जाते. परंतु, अनेक गणितज्ञांच्या मते वतुर्ळात त्रिज्या मुख्य असते, त्यामुळे परिघ आणि त्रिज्येचे गुणोत्तर (३) टाऊ मानणे अधिक सोयीचे आहे. तारीखः ३ चे मूल्य ६.२८ असल्यामुळे, अमेरिकन कॅलेंडर पद्धतीनुसार ६/२८ म्हणजे २८ जून ही तारीख Tau Day - टाऊ डे म्हणून साजरी केली जाते. इतिहासः गणितातील स्र च्या वापरावर आक्षेप घेत मायकल हार्टल यांनी सन २०१० मध्ये "दी ताऊ मॅनिफेस्टो" प्रकाशित केला आणि या दिवसाची सुरुवात केली. साजरी करण्याची पद्धतः या दिवशी




गणिताचे चाहते p च्या दुप्पट आदर दर्शवण्यासाठी दोन पाई किंवा गोल आकाराचे पदार्थ खाऊन आनंद साजरा करतात. Tau Day- ताऊ डे- गणितातील एक सिद्धांत- २८ जून रोजी साजरा केला जातो. एकदा का आपल्याला या गणितीय स्थिरांकाची कहाणी कळली की, आपण वर्तुळाकडे पुन्हा त्याच प्रकारे पाहत नाही.

पुष्कळ लोकांना माहिती आहे की पाई हे कोणत्याही वतुर्ळाच्या परिघाचे वर्तुळाच्या व्यासाचे गुणोत्तर आहे, परंतु त्याच्या जागी नवीन गुणोत्तर घेण्याच्या बाजूने हालचाली वाढत आहेत.

tau. पाईची लोकप्रियता असूनही, टाऊला पाईपेक्षा अधिक अचूक मानले जाते. दि. २८ जून २०१० रोजी, द ताऊ मॅनिफेस्टो लाँच करण्यात आला त्याच वेळी पहिल्या ताऊ दिवसाप्रमाणेच. द टाऊ मॅनिफेस्टो हे मायकेल हार्टने लिहिलेले पुस्तक होते, जे कमी ज्ञात संख्येला समर्पित होते. त्यात, पाईला अनैसर्गिक आणि गोंधळात टाकणारे म्हणून संबोधले आहे.

पाई वर्तुळाच्या परिघाची त्याच्या व्यासाशी तुलना करतो आणि अनेक गणितज्ञांना या परिमाणात रस नसतो, तर ताऊ ही संख्या आहे जी परिघाला त्या परिमाणाशी जोडते. हा दिवस सर्व गणित साजरे करण्यासाठी वापरला जातो, परंतु विशेषतः ताऊला अजूनही मान्यता मिळविण्यासाठी एक चढाओढ आहे, हे येथे उल्लेखनीयच! विविध समाज माध्यमांवरुन सदर संकलित महत्त्वपूर्ण माहिती सविनय साभार जी.

-९६९९८३६७१७

# नव्या उभारीला बळ

महाराष्ट्रातील शेती ही केवळ व्यवसाय नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, नापिकी आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. अनेक शेतकरी पीककर्जाची वेळेत परतफेड करू शकले नाहीत. कर्जबाजारी झालेल्या अनेक शेतकऱ्यांपुढे नव्याने पीककर्ज मिळविण्यात अडचणी निर्माण झाल्या.

या साऱ्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ जाहीर केली आहे. या योजनेचा उद्देश केवळ थकीत कर्ज माफ करणे नसून, शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणणे, नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन देणे आणि दीर्घकालीन कृषी सुधारणा घडवून आणणे हा आहे.

राज्य मंत्रिमंडळाने २ जून २०२६ रोजी या योजनेस मंजुरी दिली. यानुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच पात्र प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या अल्पमुदत पीककजार्चा विचार करण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे हे कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नव्हती, अशा पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचे लाभ दिले जातील. या योजनेसाठी जमिनीच्या क्षेत्रफळाची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही.

या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पुनर्गठित (Restructured) किंवा फेरपुनर्गठित पीककजार्चाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे कजार्चे पुनर्गठन झालेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे. तसेच, ज्या शेतकऱ्यांनी पूर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ चा लाभ घेतला होता, त्यांनाही या योजनेतील ठराविक निकषांनुसार लाभ मिळू शकतो. राज्य शासनाने केवळ थकीत कर्जदारांनाच मदत केली नाही, तर नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय देण्याचा निर्णय घेतला आहे. २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमानुसार पीककर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. मात्र, अशा शेतकऱ्यांनी २०२५-२६ आणि २०२६-२७ या वर्षांतील पीककर्जाचीही नियमानुसार परतफेड करणे आवश्यक आहे.



ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांच्यासाठी एकवेळ समझोता (One Time Settlement - OTS) योजना लागू करण्यात आली आहे. अतिरिक्त थकबाकीची रक्कम शेतकऱ्यांनी भरल्यानंतर त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळेल. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीदार शेतकऱ्यांनाही नव्याने आर्थिक उभारी घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाइन प्रणालीद्वारे केली जाणार असून लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रिस्टॅक या डिजिटल मंचावर नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. यामुळे लाभार्थी पडताळणी अधिक अचूक होईल, पारदर्शकता वाढेल आणि गैरव्यवहाराला आळा बसेल.

योजनेचा लाभ सर्वांना मिळणार नाही. विद्यमान व माजी मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, मासिक २५ हजारांपेक्षा अधिक वेतन घेणारे सरकारी अधिकारी-कर्मचारी, शेतीबाह्य उत्पन्नावर आयकर भरणारे, तसेच काही सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि कर्मचारी यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या गरजू आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंतच योजनेचा लाभ पोहोचावा, हा यामागील शासनाचा उद्देश आहे.

या योजनेत केवळ कर्जमाफीवर भर न देता 'सहकार स्टॅक' या डिजिटल प्रणालीची उभारणी, बँकिंग व्यवस्थेचे सक्षमीकरण आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकू नयेत, यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचीही तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना अल्पकालीन दिलासा देण्याबरोबरच कृषी क्षेत्रात संरचनात्मक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही पारंपरिक कर्जमाफीपेक्षा अधिक व्यापक स्वरूपाची योजना आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन, डिजिटल आणि पारदर्शक अंमलबजावणी तसेच दीर्घकालीन कृषी सुधारणा या चार स्तंभांवर आधारित ही योजना राज्यातील कृषी अर्थव्यवस्थेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करते. ही योजना राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांसाठी आर्थिक स्थैर्याचा नवा आधार आणि नव्याने उभारी घेऊ पाहणाऱ्या शेतकऱ्यांना बळ प्रदान करणारी ठरू शकते.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# बल्लारपूरात स्मार्ट मीटरवरुन जनआक्रोश

## ७ दिवसांत कारवाई न झाल्यास महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोनाचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**
बल्लारपूर शहरात महावितरणकडून बसविण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटरच्या विरोधात नागरिकांचा रोष तीव्र होत असून, बल्लारपूर कृती समितीने कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, बल्लारपूर यांना सविस्तर निवेदन सादर करत अनेक गंभीर आरोप केले आहेत. उपभोक्त्यांची पूर्वसंमती न घेता स्मार्ट मीटर बसविणे, त्यानंतर अनेकपटीने वाढीव वीजबिले देणे, सामान्य मीटर उपलब्ध करून न देणे तसेच ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप समितीने केला आहे.



सात दिवसांच्या आत ठोस कारवाई न झाल्यास महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही समितीने दिला आहे.
समितीने दिलेल्या निवेदनानुसार, शहरात महावितरणच्या ठेकेदारांकडून नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना अथवा लेखी संमती न घेता घरांमधील जुने व कार्यरत वीजमीटर काढून त्याऐवजी स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. विद्युत कायदा आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या (एमईआरसी) नियमांनुसार मीटर बदलण्यापूर्वी ग्राहकाला सूचना देणे व त्याची संमती घेणे आवश्यक असताना या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.
स्मार्ट मीटर बसविल्यानंतर शहरातील अनेक ग्राहकांना पूर्वीपेक्षा तीन ते चारपट जास्त रकमेची वीजबिले मिळत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. केवळ एक-दोन पंखे आणि काही एलईडी दिवे वापरणाऱ्या घरांनाही दहा ते पंधरा हजार रुपयांपर्यंतची बिले आली आहेत. दोन ते तीन महिने बंद असलेल्या घरांनाही पाच ते सात हजार रुपयांची बिले मिळाल्याचा दावा समितीने केला आहे. पूर्वी दीड ते दोन हजार रुपये येणारे मासिक वीजबिल आता आठ ते दहा हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे नव्याने बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरमध्ये तांत्रिक दोष किंवा कॅलिब्रेशनमध्ये गंभीर त्रुटी असल्याची शंका समितीने व्यक्त केली आहे.
याशिवाय, जुने मीटर खराब झाल्यानंतर नवीन सामान्य मीटर उपलब्ध नसल्याचे सांगून ग्राहकांना केवळ स्मार्ट मीटरच स्वीकारण्यास भाग पाडले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी डिजिटल मीटर अनिवार्य केल्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असून, सोलर पॅनेल असलेल्या घरांनाही मोठ्या रकमेची वीजबिले येत असल्याचा मुद्दाही समितीने उपस्थित केला आहे.
महावितरणच्या या धोरणामुळे गरीब, मजूर आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक शोषण होत असून, वीजसारख्या अत्यावश्यक सेवेसाठी नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
बल्लारपूर कृती समितीने महावितरणकडे सात प्रमुख मागण्या केल्या आहेत. उपभोक्त्यांच्या संमतीशिवाय बसविण्यात आलेले सर्व स्मार्ट मीटर तातडीने काढून त्यांच्या जागी पूर्वीप्रमाणे सामान्य मीटर बसविणे, गेल्या तीन महिन्यांतील वाढीव वीजबिलांची विभागीय पथकाकडून निष्पक्ष चौकशी करून दुरुस्ती करणे, ग्राहकांच्या लेखी मागणीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया तात्काळ थांबविणे, खराब मीटरच्या बदल्यात सामान्य मीटर उपलब्ध करून देणे, स्मार्ट मीटरधारकांची माहिती कृती समितीला देणे, जुन्या मीटरचे नियमित रीडिंग पुन्हा सुरू करणे तसेच संबंधित दोषी ठेकेदार व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे, अशा मागण्यांचा त्यात समावेश आहे.
या गंभीर प्रश्नावर सात दिवसांच्या आत समाधानकारक निर्णय न घेतल्यास बल्लारपूर शहरातील सर्व नागरिक, व्यापारी, सामाजिक संस्था, विविध राजकीय पक्ष व संघटनांना सोबत घेऊन महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल. आंदोलनादरम्यान निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.
या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री व ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, विधान परिषदेचे सदस्य, तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.
बल्लारपूर कृती समितीच्या वतीने नगर परिषद उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी नगराध्यक्ष घनश्याम मुलचंदानी, गटनेते अब्दुल करीम, नगरसेवक सिक्की यादव, कुतुबुद्दीन सिटी, प्रशांत झामरे, भारत थुलकर, भास्कर माकोडे, मंगेश बावणे, उमेश कडू, रवि पुप्पलवार, रोहित चुटे, नरेश मुंदडा, पत्रकार रमेश निषाद, सय्यद अफजल अली यांच्यासह विविध सामाजिक, व्यापारी व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

# उमरेडमध्ये दहशत माजविणाऱ्या टोळीवर 'मकोका'; दोन आरोपींविरुद्ध कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
शहरात वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या दोन आरोपींच्या टोळीविरुद्ध नागपूर ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई केली आहे.
पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, टोळीचा प्रमुख जानी उर्फ सोहेब सईद शेख (वय २३, रा. कावरापेठ, उमरेड) असून पप्पू उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने (वय २५, रा. कावरापेठ, उमरेड) हा टोळीचा सदस्य आहे. वरिष्ठ पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलिसांनी ही कारवाई केली.
२४ मे २०२६ रोजी रात्री कावरापेठ येथील हबीबी पानठेल्यासमोर झालेल्या वादातून आरोपींनी राजकुमार मारोती पवार (वय ५०) यांच्यावर चाकूने हल्ला करून त्यांचा खून केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी उमरेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासादरम्यान पप्पू उर्फ प्रफुल गायधने याचाही गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला.


आरोपी जानी उर्फ सोहेब सईद शेख


आरोपी पप्पु उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने

पोलिसांच्या तपासात संबंधित आरोपी संघटित पद्धतीने गुन्हे करत असल्याचे समोर आले. टोळीचा प्रमुख जानी उर्फ सोहेब शेख हा साथीदारांसह खून, घातक शस्त्रांनी हल्ला व इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून परिसरात दहशत निर्माण करीत असल्याचे तपासात स्पष्ट झाले. दोन्ही आरोपींविरुद्ध यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही त्यांनी गुन्हेगारी कारवाया सुरूच ठेवल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.
यामुळे उमरेड पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या टोळीविरुद्ध मकोका लागू करण्याचा प्रस्ताव तयार करून वरिष्ठ पोलीस अधीक्षकांमार्फत विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांच्याकडे पाठविला. या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत कलमे वाढविण्यात आली आहेत. संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईने गुन्हेगारी वर्तुळात खळबळ माजली आहे.

## सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी मनपाचे केले वाहन परत



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या सत्ता पक्ष नेता नरेंद्र(बाल्या) बोरकर यांनी मनपाद्वारे कार्यालयीन कामा प्राप्त झालेली स्कारपीओ गाडी नं. टल्ल-४९१४०१ वाहन मनपाला परत केले आहे.
मनपा सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर हे गुरुवारी सकाळी आपल्या घरून सिव्हील लाईन्स स्थित मनपा मुख्यालयात आपल्या कार्यलयात आले, त्यांनी घरी परत जाताना सायंकाळी मनपाद्वारे प्राप्त वाहन मनपाला परत केले. आता बोरकर हे स्वतः च्या व्यक्तिगत वाहनातून मनपा मुख्यालय येथे येणार आहेत.

# ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भगवंत गोल्हर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे माजी अध्यक्ष, नागपूर येथील युएनआयचे दीर्घकाळ ब्युरो चीफ राहिलेले ज्येष्ठ पत्रकार श्रीतुळशीदास भगवंत गोल्हर यांचे आज (गुरुवार) पहाटे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त झाली. एक अनुभवी, अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ पत्रकार हरपल्याची भावना व्यक्त केली आहे.
मूळचे माणिकवाडा (धनज), ता. नेरपरसोपंत, जि. यवतमाळ येथील असलेले गोल्हर यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात अनेक दशकांपर्यंत उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी आपल्या निर्भीड लेखणी, सामाजिक बांधिलकी



आणि पत्रकारितेतील निष्ठेमुळे पत्रकार विश्वात मानाचे स्थान निर्माण केले होते. नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पत्रकारांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.
नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागातून त्यांनी पत्रकारितेतील सुवर्णपदक प्राप्त केले होते. विधी विभागात पदव्युत्तर शिक्षण त्यांनी घेतले होते. नागपूर टाइम्समध्ये त्यांनी काही काळ पत्रकारिता केली. त्यानंतर नवी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात यूएनआयचे विधी वार्ताहर म्हणून त्यांनी काम केले आहे. याशिवाय नागपूर येथे युएनआयचे ब्युरोचीफ म्हणून दीर्घकाळ त्यांनी काम केले आहे.
नागपूर विद्यापीठात जनसंवाद विद्या विभागामध्ये त्यांनी नव्या पिढीला मार्गदर्शक म्हणूनही काम केले आहे. त्यांच्या पार्थिवावर आज, दि. २ जुलै रोजी, अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या सुविद्य पत्नी कोकिळा, अमेरिकेत स्थायिक झालेले त्यांचे चिरंजीव राहुल गोल्हर, श्वेता गोल्हर, जेष्ठ चिरंजीव डॉ. संदीप गोल्हर, वेदिता गोल्हर आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ केशवराव गोल्हर हे त्यांचे कनिष्ठ बंधू आहेत. याशिवाय कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच बराच मोठा परिवार आहे.
तुळशीदास गोल्हर यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रातील एक ज्येष्ठ, अनुभवी व मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले असून, विविध स्तरांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच नागपूर श्रमिक पत्रकार संघ, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट आणि पत्रकार क्लब ऑफ नागपूर यांच्या वतीने श्रद्धांजली देण्यात आली.
यावेळी शिरीष बोरकर, अनुपम सोनी, जोसेफ राव, रामू भागवत, विवेक पुराडभट, संगीता महाजन, नरेश लोखंडे, अनिल वासनिक, आलोक तिवारी, आनंद भिसे, अरुण आसटकर, प्रविणकुमार युएनआय, आणि पत्रकार संघाचे कर्मचारी उपस्थित होते.

# एम्पथी फाउंडेशन मुंबईतर्फे पीएम श्री जि. प. उच्च प्राथमिक शाळा चाचेर येथे सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वितरण

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
पीएम श्री जि. प. उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे मंगळवार( ता. ३० जून) ला शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.
कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता पहिलीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फूल देऊन तसेच पायांचे ठसे घेऊन जंगी स्वागत करून करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक,



पालक व ग्रामस्थांच्या सहभागातून गावामध्ये प्रवेशोत्सव दिंडी काढण्यात आली.
यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपसरपंच रविंद्र ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य सुरेंद्र टेंभरे, योगेश्वर निनावे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा अमिता वैद्य तसेच किरण बरबटे, प्रफुल्ल बादोले, रामकृष्णा आंबिलढुके , सुनिल राऊत , एकनाथ टेंभरे, पोलीस पाटील ज्ञानेश्वर नाकाडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे व डॉ. दिनेश बादोले या सर्व मान्यवरांचा हस्ते पाटपुस्तक वाटप करण्यात आले व एम्पथी फाउंडेशन मुंबई यांच्या चा कडून सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग चे मोफत वाटप करण्यात आले .
कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शिक्षक रविंद्र घुगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षिका साखरकर, बालकोटे, खंगार, उकुड्डे,शेख, खंडाईत व निमजे यांनी मोलाचे सहकार्य केले.
कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासोबत जलेबीचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभल्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

थोडक्यात

## विवेकानंद विद्यालय येथे शाळा प्रवेशोत्सव





**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
३० जून मंगळवारला कामठी तालुक्यातील पळसाड येथील विवेकानंद विद्यालय येथे शाळा प्रवेशोत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. वर्ग ५ ते १० व्या इयत्तेत नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, पुष्पगुच्छ देऊन त्याचप्रमाणे त्यांना चॉकलेट, गोड जेवण देऊन प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शाळेचे संस्था सचिव भैयाजी टाले तसेच माजी मुख्याध्यापिका वर्षा टाले यांच्या हस्ते स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यमान मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रथम दिवशीच पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. शिक्षकाकडून परिपाठ सदर करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांच्या आनंदाने गजबजलेल्या वातावरणात शाळा प्रवेशोत्सव प्रथम दिवस मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.

## लोखंडी पुलाखाली पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढा

### मनपा आयुक्त डॉ. विपीन यांचे रेल्वे प्रशासनाला निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
पावसाळ्यात लोखंडी पुलाखाली मोठ्या प्रमाणावर पाणी साचून डबके तयार होते. यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना व वाहनधारकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्येची दखल घेत मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी गुरुवारी (ता. २) लोखंडी पूल परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाचे पाणी साचू नये म्हणून मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी आठवड्याभरात ठोस निर्णय घेऊन यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.
या पाहणी दौऱ्याप्रसंगी स्थानिक नगरसेवक मनोज साबळे, अतिरिक्त आयुक्त अंकित, रेल्वेचे वरिष्ठ डीएनको सचिन गणेर, अधीक्षक अभियंता अनिल गेडाम मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त प्रमोद वानखेडे, कार्यकारी अभियंता सुनील उईके, उपअभियंता विवेक तेलरांधे, झोनल स्वच्छता अधिकारी राजेश गायधनी, सुनील खरे यांच्यासह मनपा, रेल्वे आणि महामेट्रोचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
लोखंडी पुलाखाली पाणी साचत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर स्थानिक नगरसेवक आणि नागरिकांनी मनपा आयुक्तांना या ठिकाणाची पाहणी करण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने आयुक्त डॉ. विपीन यांनी या भागाचा दौरा केला. लोखंडी पुलाखालील पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन ड्रेनज (वाहिनी) तयार करणे, तिची लेव्हल मॅच करणे आणि ते पाणी जवळच्या नाल्यात सोडण्याचे नियोजन करावे, अशी सूचना त्यांनी केली. तसेच सध्या साचलेले पाणी उपसण्यासाठी त्वरित पंप लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. या दौऱ्यादरम्यान मनपा आयुक्तांनी संत्रा मार्केटजवळील नाल्याचीही पाहणी केली. या ठिकाणी रस्त्यावर साचणारे पाणी थेट नाल्यामध्ये जावे, यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करून ताबडतोब उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले. यासोबतच, महात्मा फुले मार्केट परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना 'हॉकर्स झोन' तयार करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आदेश त्यांनी सहायक आयुक्तांना दिले.

## शासकीय व नझुल जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमितीकरणासाठी विशेष शिबीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
१ जानेवारी २०११ पर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय व नझुल जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करुन पट्टे वाटपासाठी आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्यासाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थीनी या विशेष शिबीराचा लाभ घेऊन आपले अर्ज व आवश्यक कागदपत्रे नियोजित वेळेत सादर करावीत, अशा सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत.
१० जुलै व ११ जुलै रोजी लक्ष्मीनगर झोन-१ कार्यालय, १३ व १४ जुलै रोजी धरमपेठ झोन-२, १५ व १६ जुलै रोजी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, हनुमान नगर झोन-३, १७ व १८ जुलै रोजी धंतोली झोन-४, २० व २१ जुलै रोजी नेहरु नगर ५, २२ व २३ जुलै रोजी गांधी महाल झोन-६, २४ व २५ जुलै रोजी सतरंजीपूरा झोन-७, २७ व २८ जुलै रोजी लकडगंज झोन-८, २९ व ३० जुलै रोजी आसिनगर झोन-९, ३१ जुलै व १ ऑगस्ट रोजी मंगळवारी झोन-१० कार्यालय येथे पात्र नागरिकांनी सकाळी ९.३० ते सांयकाळी ५.३० यावेळेत उपस्थित राहावे.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे आणावीत**
दिनांक १.१.२०११ रोजी अतिक्रमण अस्तित्वात असल्याचा पुरावा (ग्राह्य कागदपत्रे), मतदार यादीतील नाव (स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी वॉर्ड/ प्रभागनिहाय तयार केलेली), वीज बिल, मालमत्ता कराची पावती, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना, इतर शासकीय निवासी पुरावे (शिधापत्रिका वगळून), इतर लागणारे आवश्यक कागदपत्रे, मागील एका वषार्तील रहिवासाचा कोणताही एक शासकीय पुरावा सादर करणे अनिवार्य राहील. शिबीरात मार्गदर्शन, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध राहील.

थोडक्यात

## दक्ष आणि तनिष्कने अल्पाईन स्टाईलमध्ये केला भृगू लेक ट्रेक यशस्वीरीत्या पूर्ण




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरचे तरुण गियारोहक दक्ष खंते आणि तनिष्क देशपांडे यांनी हिमाचल प्रदेशातील आव्हानात्मक भृगू लेक ट्रेक अल्पाईन स्टाईलमध्ये यशस्वीरीत्या पूर्ण केला. कमीत कमी साधनसामग्रीचा वापर करून, स्वतःचे सर्व साहित्य, अन्न व निवारा पाठीवर वाहून नेत, तळापासून अंतिम ठिकाणापर्यंत एकाच प्रयत्नात ट्रेक पूर्ण करण्याची अल्पाईन स्टाईल पद्धत आहे. दक्ष आणि तनिष्क यांच्यासह इतर ठिकाणचे आणखी सहा ट्रेकर या तीन दिवसांच्या साहसी मोहिमेत सहभागी झाले होते. त्यांनीदेखील ही मोहिम पूर्ण केली. या ट्रेकमुळे सहभागींना पर्वतीय वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव, स्वावलंबन, मैदानी जीवनातील कौशल्ये, आपत्कालीन परिस्थितीत टिकून राहण्याची क्षमता तसेच जबाबदार साहसी पर्यटनाचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली. याशिवाय हिमालयीन प्रदेशाचे निसर्गसौंदर्य आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा अनुभवण्याचीही संधी त्यांना लाभली.

सीएसी ऑलराऊंडरतर्फे भृगू लेक ट्रेक यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व आठ ट्रेकर्सचे अभिनंदन करण्यात आले आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि निसर्गाशी अधिक दृढ नाते निर्माण करणाऱ्या अशा साहसी उपक्रमांमध्ये अधिकाधिक युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा संदेश देणारी 'जीवन उत्सव' वेब सिरीज सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरचे उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते विलास काळे यांनी आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त समाजाला प्रेरणादायी भेट देण्याच्या उद्देशाने 'जीवन उत्सव - अ सेलिब्रेशन ऑफ लाईफ' या वेब सिरीजची निर्मिती केली आहे. जीवन अधिक समृद्ध, अर्थपूर्ण आणि आनंदी कसे जगावे, याविषयी विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींशी संवाद साधून त्यातून प्रेरणादायी विचार प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचा या मालिकेचा उद्देश आहे. आनंदाचा शोध प्रत्येकजण घेत असतो; मात्र तो क्षणिक न राहता आयुष्यभर टिकणारा कसा बनवायचा, संकटांवर मात करत जीवनाचा उत्सव कसा साजरा करायचा, याचा वेध या मालिकेत घेतला जाणार आहे. कला, संगीत, रंगभूमी, संस्कृती, प्रवास, मान्यवरांशी संवाद, व्यक्तिमत्त्व विकास, प्रशिक्षण तसेच अध्यात्म अशा विविध विषयांवर आधारित अनुभवकथन या मालिकेतून सादर केले जाणार आहे. या उपक्रमाची सुरुवात 'किस्से मेरे अनुभवों के' या २० भागांच्या विशेष मालिकेने होत आहे. या मालिकेत ज्येष्ठ प्रसारक, रेडिओ उद्घोषक आणि सूत्रसंचालक किशन शर्मा आपल्या आयुष्यातील संस्मरणीय अनुभव शुभांगी रायलू यांच्याशी संवादाच्या माध्यमातून उलगडणार आहेत.

८२ वर्षीय किशन शर्मा यांनी विविध भारतीमध्ये तब्बल २७ वर्षे कार्य केले आहे. 'छायागीत', 'बेला के फूल', 'भुले बिसरे गीत' यांसारख्या लोकप्रिय कार्यक्रमांचे त्यांनी निर्मिती व सूत्रसंचालन केले आहे. साहित्य, चित्रपट, संगीत, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज व्यक्तींशी त्यांचा जवळचा संपर्क राहिला आहे. अटलबिहारी वाजपेयी, राज कपूर, कवी प्रदीप, आशा भोसले, शंकर-जयकिशन, विनोबा भावे यांसारख्या अनेक दिग्गज व्यक्तींशी झालेल्या त्यांच्या भेटीगाठींचे आणि अनुभवांचे अनेक अनोखे, कमी परिचित पैलू या मालिकेतून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहेत. या वेब सिरीजचे संपूर्ण चित्रीकरण सीताबर्डी येथील फॉर्च्यून मॉलमधील 'द बुटी हाऊस स्टुडिओ' येथे करण्यात आले आहे. स्टुडिओचे संचालक आदित्य बुटी आणि त्यांच्या व्यावसायिक चमूने चित्रीकरण, निर्मिती, संकलन तसेच संपूर्ण पोस्ट-प्रॉडक्शनची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे.

## २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत 'विधिलिखित'ला उल्लेखनीय यश

### संगीत, वेशभूषा आणि अभिनय विभागात पुरस्कारांची कमाई




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित २०२५-२६ च्या २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या विधिलिखित या नाटकाला उल्लेखनीय यश मिळाले आहे. या स्पर्धेत मिनल बाविसकर यांना सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक या विभागात द्वितीय पारितोषिक व रोख पारितोषिक प्राप्त झाले. तसेच कोमल चौधरी यांना सर्वोत्कृष्ट वेशभूषा विभागात द्वितीय पारितोषिकासह रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. याशिवाय, विधिलिखित या नाटकासाठी कु. देवश्री नंदवंशी हिला अभिनयाचे गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले, तर नकुल श्रीवास यांना रंगभूषेसाठी गुणवत्ता प्रमाणपत्र व रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस तसेच सीमा फडणवीस यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# परिवहन विभागाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करा!

### मनपा आयुक्त डॉ. विपीन यांचे विभागाला निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचे सक्षमीकरण करण्यासाठी, तसेच आपली बससेवेच्या माध्यमातून मनपाचे उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढविता येईल आणि परिवहन विभाग व आपली बस सेवेविषयी नागरिकांमध्ये सकारात्मक मत होईल याकरिता तातडीने एक दर्जेदार व सर्वसमावेशक 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्याचे निर्देश आज (ता. १) मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी परिवहन सभापती मंगला खेकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. तसेच परिवहन विभागाची श्वेतपत्रिका काढण्याची सूचना केली.

यासंदर्भात महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, यांच्यासह इतर पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्यात यावे अशी सूचना बैठकीत देण्यात आले.

मनपा मुख्यालयातील आयुक्त सभा कक्षात मनपा परिवहन विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अंकित, प्र.अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, ऑपरेशन व्यवस्थापक राजीव घाटोळे, व्यवस्थापक प्रशासन गजानन नागुलवार, कामगार अधिकारी अरुण पिंपुर्डे, तसेच चलो प्रोजेक्टचे प्रमुख अजय कुमार, बस ऑपरेटर्स यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी मनपाच्या परिवहन विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या आपली बस च्या माध्यमातून 'नॉन-फेअर रेव्हेन्यू' वाढविण्याची गरज असल्याचे सांगत, चांगल्या सल्लागारच्या माध्यमातून हे कामे होऊ शकते यासाठी परिवहन विभागाकरिता तातडीने सल्लागार नेमणूक करण्याचे निर्देश त्यांनी दिले.




मनपाच्या भंगार (स्क्रॅप) बसेसचा कल्पकतेने वापर करून, मिनी लायब्ररी किंवा लहान रेस्टॉरंट खाजगी संस्थांच्या माध्यमातून सुरू करता येऊ शकतात का याचा विचार करून, मनपा मुख्यालय, आयटी पार्क, मिहान आणि मेडिकल कॉलेज परिसरामध्ये या बसेस उभ्या करून त्यांचा उपयोग लहान रेस्टॉरंटसाठी करून मनपाचे उत्पन्न वाढेल यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

याशिवाय एनएमआरडीए क्षेत्रात मनपातर्फे येत्या काळात दिल्या जाणाऱ्या परिवहन सेवा, तेथिल सुविधा, तसेच नागरिकांकडून आकारले जाणारे तिकीट दर याबाबींवर प्रस्तावासह संबंधित विभागांची तातडीने बैठक घेण्याचे निर्देश दिले.

महिला बचत गटांच्या माध्यमातून परिवहन कार्ड नागरिकांना देण्यात यावे आणि या कामात आशा स्वयंसेविकांची मदत घ्यावी, अशा सूचना त्यांनी केल्या. शहरातील विविध मॉल्स, चित्रपटगृहे, एमआयडीसी आणि इतर गर्दीच्या भागांत परविहन कार्ड साठी स्टॉल्स लावण्यात यावे. डिजीटलल माध्यमांचा प्रभावी वापर करून बस प्रवाशांची संख्या (रायडरशिप) वाढविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

शहराच्या कानाकोपऱ्यांत असलेल्या विविध कंपन्यांसाठी प्रीमियम बस सेवा देण्यासह विमानतळ सेवा (एअरपोर्ट सर्व्हिस) वाढविण्यात यावी, विद्यार्थ्यांना शाळांसाठी मासिक पासची सुविधा असावी, तसेच 'मेट्रो इंटिग्रेटेड सर्व्हिस'चा विस्तार करण्यात यावा, अशा विविध सूचना त्यांनी केल्या.

मनपाचे परिवहन विभागाचे उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढेल यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देत, देशातील इतर शहरांमध्ये बसेसवर ज्याप्रमाणे जाहिराती दिल्या जातात, त्याच धर्तीवर मनपाच्या आपली बस वर खाजगी संस्थांची जाहिरात लावता यावी, यासाठी नवीन जाहिरात धोरण, होर्डिंग्ज पॉलिसी तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

याशिवाय इतर शहरांमधील परिवहन सेवांच्या धोरणांचा अभ्यास करून, त्यातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करत एक उत्कृष्ट धोरण तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नीती आयोगाच्या परिवहन विषयक चांगल्या योजनांवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

यावेळी मनपा आयुक्तांनी परिवहन विभागाचे अल्पकालीन, मध्यमकालीन, दीर्घकालीन, उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. याशिवाय, मनपाचे सर्व बस डेपो 'मॉनेटाईज' होऊन त्यातून मनपाला अधिक जास्त उत्पन्न मिळेल, तसेच या सर्व जागांचा उपयोग पार्किंग, पेट्रोल पंप, रेस्टॉरंट, शॉपिंग यांसारख्या व्यावसायिक कामांसाठी करून मनपाचे उत्पन्न वाढेल याकरिता लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश निर्देश दिले. याशिवाय परिवहन विभागाची श्वेतपत्रिका काढण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. अतिरिक्त आयुक्तांना यांना परिवहन विभागाच्या विविध समस्यांवर आणि धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी महिन्यातून दोनदा बैठका घेण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

**मोरभवन येथे नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात- परिवहन सभापती मंगला खेकरे**

मोरभवन बस स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था, प्रतीक्षालय, बसच्या वेळेची माहिती देणारे डिजिटल डिस्प्ले, तसेच मोरभवन बस स्टँडच्या चारही बाजूंना आधुनिक टॉयलेट सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना परिवहन सभापती श्रीमती मंगला खेकरे यांनी बैठकीत केल्या. याचबरोबर मोरभवन परिसराचे काँक्रीटीकरण करावे, तसेच सुशोभिकरण करण्यासाठी वृक्षारोपण करावे, शहरातील विविध बस थांब्यांवर नागरिकांना सहज दिसेल असे माहिती फलक लावण्यात यावेत, तसेच खापरी डेपोला सुरक्षा भिंत तयार करण्यात यावी, अशा विविध सूचना त्यांनी मांडल्या. यावर मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवला. तसेच, खापरी बस डेपोच्या सुरक्षेसाठी तिथे लोखंडी आणि तारांचे मजबूत कुंपण लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करा!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील सखल भागात साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा करण्यासाठी तसेच नदी व नाल्यांच्या संरक्षण भिंतीचे मजबुतीकरण करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना कराव्या, असे निर्देश स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी दिले.

पावसाळा सुरू झाल्यानंतर शहरातील सखल भागात साचणाऱ्या पाण्याचा निचरा करणे, नागनदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या संरक्षण भिंतीचे बळकटीकरण करणे तसेच मनपाच्या इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्याच्या संदर्भात स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांची डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात बैठक घेतली. यावेळी सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, नगरसेवक मनोज साबळे, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक



अभियंता अनिल गेडाम, उपायुक्त गणेश राठोड, उपायुक्त अशोक गराटे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता प्रमुख्याने उपस्थित होते.

पावसाळ्यात सखल भागांमध्ये साचणाऱ्या पाण्याची त्वरित विल्हेवाट लावण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक झोनमधील अधिक पाणी साचणारे स्पॉट शोधून या सखल भागातून पाण्याचा निचरा कसा त्वरित करता येईल, यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे दाणी-वखरे यांनी सांगितले.

शहरातील नागनदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या संरक्षण भिंतीच्या बळकटीकरणासाठी सुद्धा त्वरित उपाययोजना करण्यात याव्या. यासंदर्भात संबंधित झोन सभापती व नगरसेवकांच्या सूचनांचा प्राधान्याने विचार करावा. प्रत्येक कार्यकारी अभियंत्यांनी कामाचे प्राधान्य क्रम ठरवून त्वरित कामे करण्याच्या सूचना श्रीमती शिवानी दाणी-वखरे यांनी दिल्या.

**खुल्या चेंबरला त्वरित झाकणे लावा- नरेंद्र (बाल्या) बोरकर**

शहरातील गडर लाईनच्या खुल्या चेंबरला झाकणे त्वरित लावण्याची सूचना सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी केली. गडरलाईनचे चेंबर खुले राहत असल्याने अनेकदा दुर्घटना घडण्याची शक्यता राहते. यासाठी चेंबरवर झाकणे लावण्याचे काम त्वरित करण्यात यावे. त्याचप्रमाणे गडरलाईनचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदाराला दर्जेदार गडर लाईन बांधण्याचा पुरेसा अनुभव असण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अनेकदा कंत्राटदाराला गडरलाईन बांधण्याचा पुरेसा अनुभव नसल्याने काम चांगले होत नाही.

**स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी दिले निर्देश**

यामुळे नागरिकांना तसेच लोकप्रतिनिधींना त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**७५ इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग होणार**

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शहरातील मनपाच्या ७५ इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रत्येक झोनमधील मनपाच्या शाळा, ग्रंथालये, दवाखाने, झोन कार्यालये, उद्याने, खेळाची मैदाने, स्टेडियममध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग करून पावसाचे पाणी विहीर किंवा बोअरवेलमध्ये झिरपेल, याची काळजी घेतली जाईल. यामुळे शहरातील भूजल पातळी वाढण्यास मदत होईल, असे आयुक्त डॉ. विपीन यांनी यावेळी सांगितले. ज्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची प्रणाली बंद अवस्थेत आहे. ही प्रणाली त्वरित सुरू करावी व ज्या इमारतींमध्ये ही व्यवस्था नाही, त्या इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंगची प्रणाली सुरू करण्याची सूचनाही यावेळी आयुक्त डॉ. विपीन यांनी यावेळी दिल्या.

## 'प्रयोगशील शेती पुरस्कार २०२६'चे ४ जुलै रोजी वितरण

### चार प्रयोगशील शेतकरी आणि एका कृषी पत्रकाराचा होणार सन्मान, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वसंतराव नाईक प्रतिष्ठान आणि कृषी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी सप्ताहानिमित्त शनिवार, ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता वनामती सभागृह, व्हीआयपी रोड, गोरेपेठ नागपूर येथे प्रयोगशील शेती पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदा प्रथमच राज्यातील विविध जिल्ह्यांतील चार प्रयोगशील शेतकऱ्यांसह शेती विषयक सातत्यपूर्ण व अभ्यासपूर्ण वार्तांकन करणाऱ्या एका पत्रकारालाही या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख २० हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे आहे.

महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. कार्यक्रमाला माजी आमदार व वसंतराव नाईक प्रतिष्ठानचे

**पुरस्कारप्राप्त मान्यवर:**
अजे (अजय) वसंतराव देशमुख - जिल्हा बुलढाणा, नेशान विजय राऊत - पुसद, छाया ताई राठोड - आर. व्ही. टेकडी तांडा, जिल्हा वर्धा, विजय बिजवे - अमरावती, पत्रकार सुनील चरपे - नागपूर

अध्यक्ष ॲड. निलय नाईक, प्रतिष्ठानच्या सचिव प्रगती पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी असतील.

दरवर्षी १ ते ७ जुलै या कृषी सप्ताहात माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येतो. या कार्यक्रमाला शेतकरी, कृषी क्षेत्राशी संबंधित मान्यवर तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रगती पाटील यांनी केले आहे.

## हृदय, मधुमेह आणि लठ्ठपणापासून बचावासाठी तेलाच्या वापरात बदलाची गरज

### रिफाइंड तेलाचा अतिरेक टाळून कच्च्या घाणीच्या विविध पारंपरिक तेलांचा आळीपाळीने वापर आणि मर्यादित सेवनाचा आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

बदलती जीवनशैली, वाढते हृदयविकार, मधुमेह, लठ्ठपणा आणि उच्च रक्तदाब यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांच्या वाढत्या प्रमाणामुळे आता केवळ आहार नव्हे, तर स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या तेलाची योग्य निवडही तितकीच महत्त्वाची ठरली आहे. रिफाइंड तेलाचा अतिरेक टाळून पारंपरिक तेलबियांपासून तयार होणारे कच्च्या घाणीचे (कोल्ड-प्रेस्ड) शुद्ध तेल मर्यादित प्रमाणात वापरणे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते, असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे.

भारतात प्राचीन काळापासून मोहरी, शेंगदाणा, तीळ, जवस, करडई आणि खोबरेल तेलाचा वापर होत आला आहे. प्रदेशानुसार हवामान, शेती आणि आहारपद्धती लक्षात घेऊन या तेलांचा वापर केला जातो. उत्तर भारतात मोहरी, गुजरात-राजस्थानमध्ये शेंगदाणा व तीळ, महाराष्ट्रात करडई व जवस, तर दक्षिण भारतात खोबरेल तेलाचा प्रामुख्याने वापर केला जातो.

तज्ज्ञांच्या मते, एकाच प्रकारचे तेल सातत्याने वापरण्यापेक्षा शेंगदाणा, तीळ, मोहरी, सूर्यफूल, सोयाबीन, जवस आणि राईस ब्रॅन यांसारख्या विविध तेलांचा आळीपाळीने वापर केल्यास शरीराला आवश्यक असलेल्या फॅटी ॲसिडचे संतुलन राखण्यास मदत होते.

त्याचबरोबर तेलाचे प्रमाण नियंत्रित ठेवल्यास हृदयविकार, लठ्ठपणा आणि रक्तातील वाईट (एलडीएल) कोलेस्टेरॉल वाढण्याचा धोका कमी होतो.

विशेष म्हणजे, एकदा तळणीसाठी वापरलेले तेल वारंवार गरम करून वापरणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते. अशा तेलामध्ये अपायकारक घटक तयार होऊन हृदयविकार, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे शक्यतो ताजे तेल वापरणे आणि तळलेल्या पदार्थांचे सेवन कमी करणे आवश्यक आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे खाद्यतेलाची मागणी वाढत



असताना तेलबियांचे उत्पादन अपेक्षित वेगाने वाढत नसल्याने विविध प्रकारच्या तेलांचा वापर वाढला आहे. त्यामुळे ग्राहकांनी केवळ किंमत पाहून नव्हे, तर तेलाची गुणवत्ता, उत्पादन पद्धत आणि पौष्टिक मूल्य लक्षात घेऊन तेलाची निवड करावी, असे आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी केले आहे.

**"तेलाचे प्रमाण आणि योग्य निवड दोन्ही महत्त्वाचे"**

"निरोगी राहण्यासाठी तेलाचे प्रमाण मर्यादित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पुरुषांनी सुमारे ३० ग्रॅम आणि महिलांनी २० ग्रॅम तेलापेक्षा अधिक सेवन करू नये. शक्य असल्यास कच्च्या घाणीचे (कोल्ड-प्रेस्ड) तेल वापरावे. तसेच एकाच प्रकारचे तेल सतत न वापरता विविध तेलांचा आळीपाळीने वापर केल्यास शरीराला आवश्यक पोषक घटक मिळतात आणि हृदयाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते."

**- डॉ. आकाश वाघमारे**
**वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मेंढला**

नियमित व्यायाम, संतुलित आहार, भरपूर फळे व भाज्यांचे सेवन, पुरेशी झोप आणि मर्यादित तेलाचा वापर या सवयी अंगीकारल्यास हृदयविकार, मधुमेह आणि लठ्ठपणासारख्या आजारांपासून मोठ्या प्रमाणात बचाव होऊ शकतो.

**किती तेल खावे?**

निरोगी राहण्यासाठी पुरुषांनी दिवसाला सुमारे ३० ग्रॅम, तर महिलांनी २० ग्रॅम तेलापेक्षा अधिक सेवन टाळावे. तेलाचा अतिरेक न करता संतुलित आहार आणि नियमित शारीरिक हालचालींवर भर देणे हीच निरोगी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

थोडक्यात

## राज्यातील ओबीसी प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील ओबीसी प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी तसेच उच्च शिक्षणाकरिता शासनाने बहुजन कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आहे. महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याकरिता व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी महाराष्ट राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन रहाटे कॉलनी बी विंग ३०३, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, नागपूर ४४००२२ किंवा फोन नं. ०७१२-२९५६०८६, ७७५८८६६६९६ तसेच संकेतस्थळ www.msobcfdc.in येथे संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक सुशांत बेझलवार यांनी केले आहे.

## राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचा समारोप रविवारी नागपुरात

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरींसह अनेक मान्यवरांची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर आयोजित करण्यात आलेल्या



'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा २०२६' या राज्यव्यापी अभियानाचा समारोप रविवार, दि. ५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे होणार आहे. समारोप कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे राहणार आहेत. २२ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत राज्यभर राबविण्यात आलेल्या या यात्रेचा प्रारंभ पुणे येथून झाला होता. गोसंवर्धन, गोसेवा, देशी गोवंश संवर्धन आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जनमानसात रुजविणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे.

यात्रेदरम्यान गोआधारित शेतीचा प्रचार-प्रसार, गोशाळा आत्मनिर्भर करण्यासाठी मार्गदर्शन, गोबर व गोमूत्रापासून तयार होणाऱ्या मूल्यवर्धित उत्पादनांची माहिती, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या विविध योजनांचा प्रसार, गोशाळा संचालकांच्या आढावा बैठका, गोशाळा व पशुसंवर्धन विभागातील समन्वय, पोलिस प्रशासन व गोरक्षक यांच्यातील समन्वय, संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायद्याबाबत जनजागृती तसेच देशी गोवंशाच्या संगोपनाबाबत लोकजागृती करण्यात आली. समारोपप्रसंगी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, महापौर निता ठाकरे, विविध लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, गोशाळा संचालक आणि गोसेवा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या समारोप सोहळ्यास पशुपालक, शेतकरी, गोशाळा संचालक, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गोसंवर्धनाच्या या जनजागृती अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नितीन फुके यांनी केले आहे.

## ७ व ८ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व अंशत: अनुदानित शाळा बंद

### शिक्षक समन्वय संघाचा राज्यव्यापी निर्णय, अनुदानासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी तीव्र आंदोलनाची हाक



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे -सालेकसा**

महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षक समन्वय संघाने ७ व ८ जुलै २०२६ रोजी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो शाळांमधील अध्यापनाचे कामकाज दोन दिवस ठप्प ठेवून आझाद मैदानावर हजर राहावे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुदानासह विविध मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असून, अखेर शाळा बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

या आंदोलनात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक शाळेने आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून शासनापर्यंत आपल्या न्याय्य मागण्या पोहोचवाव्यात, असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने करण्यात आले आहे. संघटनेच्या मते, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी वर्षानुवर्षे प्रामाणिक सेवा बजावली आहे; मात्र त्यांना आर्थिक व प्रशासकीय न्याय मिळालेला नाही. त्यामुळे हा लढा केवळ शिक्षकांचा नसून शिक्षण व्यवस्थेच्या सन्मानासाठी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शिक्षक समन्वय संघाने दिला आहे.

# आयुष स्वीट कंपनी'वर धाड; ५ अल्पवयीन बालकांची सुटका

### नागपुरात बालमजुरीविरोधात मोठी कारवाई, मालकावर गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात बालमजुरी विरोधातील मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. कळमणा पोलीस स्टेशन हद्दीतील भरतवाडा रोड परिसरातील 'आयुष स्वीट कंपनी' येथे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय आणि कळमणा पोलीस यांच्या संयुक्त पथकाने धाड टाकून बालमजुरीच्या विळख्यात अडकलेल्या पाच अल्पवयीन बालकांची सुटका केली. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

धाडीदरम्यान संबंधित आस्थापनात पाच अल्पवयीन बालके काम करताना आढळून आली. प्राथमिक चौकशीत त्यांच्याकडून अल्प मोबदल्यावर काम करून घेतले जात असल्याचे समोर आले. सुटका करण्यात आलेल्या सर्व बालकांना तातडीने संरक्षण देत त्यांच्या पुनर्वसनासाठी बालगृहात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी संबंधित आस्थापनाच्या मालकाविरुद्ध बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ मधील कलम ३, ३अ व १४ तसेच जुवेनाईल जस्टिस (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम ७५ व ७९ अन्वये कळमणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

बालमजुरी हा केवळ कायद्याचा भंग नसून बालकांच्या शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित भविष्यावर घाला घालणारा गंभीर सामाजिक गुन्हा असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही बालमजुरी होत असल्याचे आढळल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.



ही कारवाई जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण काळे (कळमणा पोलीस स्टेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, पोलीस उपनिरीक्षक सौरभ बानुगे (कळमणा पोलीस स्टेशन), चाईल्ड हेल्पलाईन प्रतिनिधी अनिकेत भिवगडे, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या रूपाली वानखेडे तसेच कळमणा पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्तरीत्या यशस्वीरित्या पार पाडली.

बालमजुरीमुक्त समाज घडविण्यासाठी प्रशासनासोबत प्रत्येक नागरिकानेही जबाबदारीने पुढे येणे आवश्यक आहे, असा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

## ग्राहकांनी पेट्रोल अथवा डिझेलची खरेदी करताना रिडिंगची खातरजमा करून खरेदी करावी!

### वैध मापन शास्त्र विभागाचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पेट्रोलपंपांच्या पडताळणीची प्रक्रिया वैधमापनशास्त्र अंमलबजावणी नियमांना अनुसरून अतिशय नियोजनबध्द पध्दतीने पार पाडली जाते. तथापि, ग्राहकांनी पेट्रोलपंपावर पेट्रोल अथवा डिझेल भरताना प्रथम शून्य रिडींग आहे की नाही, याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे पेट्रोलसोबत ऑईल घेताना मापाची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन वैधमापन शास्त्र विभागाचे उपनियंत्रक वि.भा. झोटे यांनी ग्राहकांना केले आहे.

ग्राहकहिताच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र वैधमापनशास्त्र अंमलबजावणी नियम २०११ च्या नियम १२ नुसार यंत्रणेमार्फत २ वषार्तून एकदा पेट्रोल पंपाची पडताळणी व मुद्रांकन करणे बंधनकारक आहे. पडताळणी व मुद्रांकनाची तपासणी ही वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम २०११ च्या नियम १३ प्रमाणे केली जाते. ज्यामध्ये प्रामुख्याने अचूकता वर्ग, क्षमता, फ्लो रेटच्या अनुषंगाने निर्देशीत केलेल्या ग्राह्य त्रुटीनुसार पडताळणी व मुद्रांकनाची कामे कली जाते.

पडताळणी व मुद्रांकनाची कामे करतेवेळी वैध मापन शास्त्र विभागाच्या निरीक्षकांच्या व्यतिरिक्त संबंधित पेट्रोल पंपाच्या कंपनीचे विक्री अधिकारी, मूळ उपकरण निर्मात्याचे अभियंता / तंत्रज्ञ हे उपस्थित असतात. तसेच, कॅलीब्रेशन करतेवेळी पंप हा मूळ उपकरण निर्मात्याच्या सर्व्हरवरुन ओटीपी घेऊन व जुने के-फॅक्टर व जुन्या शासनाच्या मुद्रांकन शिक्क्याची तपासणी करुनच पडताळणीची कामे केली जातात.

त्यामध्ये प्रामुख्याने फ्लो मीटर, सीपीयू व कि पॅडचे सीलींग केले जाते. त्यानंतर पुन्हा एकदा पंपाची अचूकता अधिकतम ग्राहय त्रुटीनुसार म्हणजे ५ लिटर मागे +, - २५ मिली अचूकता वर्ग ०.५ मध्ये असल्यासच पडताळणी व मुद्रांकनाचे काम करण्यात येते. मुद्रांकन पार पडल्यावर मूळ उपकरण निर्मात्याचे अभियंता किंवा तंत्रज्ञ हे नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी निर्देशित केलेल्या तरतुदीनुसार अंकेक्षण अहवाल तयार करतात. तो सर्व उपस्थितांच्या स्वाक्षऱ्या घेऊन संबंधित निरीक्षकाकडे सादर केल्यानंतरच वैध मापन शास्त्र यंत्रणेचे निरीक्षक हे




संगणकावर तांत्रिक माहितीनुसार पडताळणी प्रमाणपत्र तयार करतात. अशा प्रकारे नियोजनबध्द पेट्रोल पंप पडताळणीची कामे केली जातात. त्यामुळे कोणत्याही ग्राहकाने ऐकीव माहितीवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन वैध मापन शास्त्र विभागाने केले आहे.

## जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय येथे कै. वसंतराव नाईक यांची जयंती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी नागपूर, प्रकल्प संचालक (आत्मा) नागपूर, कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद नागपूर आणि पंचायत समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची ११३ वी जयंती शेतकरी प्रशिक्षण सभागृह, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय येथे साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नागपूर रवींद्र मनोहरे, प्रकल्प संचालक आत्मा डॉ अर्चना कडू , डॉ. पं. दे.कृ. विद्यापीठ, येथील कृषी विद्यावेत्ता विनोद खडसे, कीटकशास्त्र शास्त्रज्ञ राहुल वडस्कर, कृषी विकास अधिकारी समाधान धुळधुळे, प्रगतीशील शेतकरी, विकास स्पर्धा पुरस्कार प्राप्त शेतकरी, कृषि प्रक्रिया करणारे शेतकरी उद्योजक, कृषि क्षेत्रामध्ये विशेष योगदान देणाऱ्या महिला शेतकरी , पाणी फाउंडेशन अंतर्गत कृषी सखी उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून पिक स्पर्धेतील विजेते व प्रगतीशील शेतकऱ्यांचा शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये कृषी विकास अधिकारी समाधान धुळधुळे यांनी कै. वसंतराव नाईक यांचा जीवनपट व कृषी दिनाचे महत्व सर्व उपस्थितांना सांगितले. प्रकल्प संचालक आत्मा डॉ अर्चना कडू यांनी सेंद्रिय शेतीवर भर द्यावा आणि बांधावरील जैविक निविष्ठा केंद्रावर येथून जैविक निविष्ठाचा वापर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करावा, असे सांगितले. भविष्यात सेंद्रिय शेतकरी गटातील सेंद्रिय तांदूळ आणि सेंद्रिय तुरीची डाळ विक्रीस ठेवणार असेही सांगितले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे यांनी अल निनोच्या प्रभावामुळे या खरिपामध्ये पाऊसाचे प्रमाण कमी असल्याने शेतकऱ्यांनी पिकाचे नियोजन कृषी



विभागाच्या सल्ल्याप्रमाणे करावे असे सांगितले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे यांनी कृषीतील कै. वसंतराव नाईक यांचे योगदान व कृषीची पुढील दिशा यावर माहिती दिली . जिल्ह्यामध्ये सर्वच तालुक्यामध्ये कृषिदिन साजरा करण्यात आला. त्याठिकाणी वृक्षारोपण आणि तालुका नागपूर येथील वलणी या गावात कापूस पिकाचे सरी वरंभा लागवड प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना करून दाखविण्यात आले.

## वसंतराव नाईक यांना महावितरण व महानिर्मितीतर्फे विनम्र अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राच्या आधुनिक कृषी व औद्योगिक विकासाचा पाया रचणारे, हरित क्रांतीचे प्रणेते आणि बहुजन समाजाच्या उत्कषार्साठी आयुष्य वेचणारे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना महावितरण आणि महानिर्मितीच्या वतीने आज कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. महावितरण आणि महानिर्मितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीचे आणि लोककल्याणकारी कार्याचे स्मरण केले.

या अभिवादन कार्यक्रमास महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता नारायण राठोड, महावितरणचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे व दिपाली माडेलवार, कार्यकारी अभियंता अमित शिवलकर यांच्यासह महावितरण आणि महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत ओळख देणारे विधेयक ऐतिहासिक; महिला सक्षमीकरणाला नवी दिशा

### आ. डॉ. आशिषराव देशमुख

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

मुंबई येथील महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात राज्य सरकारने 'महाराष्ट्र महिला सक्षमीकरण विधेयक, २०२६' मांडले असून, या विधेयकामुळे शेती क्षेत्रात कार्यरत लाखो महिलांना प्रथमच अधिकृत महिला शेतकरी म्हणून ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या विधेयकाचे स्वागत करत सावनेरचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी हा निर्णय महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले ऐतिहासिक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

आमदार डॉ. आशिषराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्रातील ग्रामीण भागात महिलांचे शेतीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणी, लागवड, निंदणी, कापणी, पशुपालन तसेच शेतीपूरक विविध कामांमध्ये महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी असतात. मात्र, जमिनीची मालकी त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळत नव्हती. परिणामी, कृषी कर्ज, पीक विमा, विविध शासकीय योजना, कृषी अनुदाने आणि इतर सुविधांचा लाभ घेण्यात अनेक अडचणी निर्माण होत होत्या.

याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हे विधेयक मांडले असून, प्रत्यक्ष



शेती करणाऱ्या महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीमार्फत अर्ज स्वीकारून आवश्यक पडताळणीनंतर प्रमाणपत्र देण्यात येणार असून, अर्ज नामंजूर झाल्यास त्यामागील सक्षम कारणे लेखी स्वरूपात देणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

या विधेयकामुळे महिला शेतकऱ्यांना बँक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान, शासकीय योजनांचा लाभ, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, कौशल्य प्रशिक्षण, बाजारपेठेपर्यंत सुलभ प्रवेश आणि विविध कृषी सेवांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळणार आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण होण्यास मोठी चालना मिळेल.

याशिवाय, महिला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे धोरण आखण्यासाठी आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद' स्थापन करण्यात येणार आहे. या परिषदेत उपमुख्यमंत्री, कृषी, महसूल, महिला व बालविकास विभागांसह विविध विभागांचे मंत्री सदस्य असतील, तर कृषी विभागाचे सचिव सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना करून महिला शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात येणार आहे.

आ. डॉ. आशिषराव देशमुख म्हणाले की, हे विधेयक केवळ महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख देणारे नाही, तर त्यांच्या हक्कांचे संरक्षण, सन्मान आणि सर्वांगीण विकासासाठी मजबूत संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणारे आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होणारी परिषद महिला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

राज्य सरकारने महिला शेतकऱ्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना स्वतंत्र ओळख, अधिकार आणि संधी उपलब्ध करून देण्याचा घेतलेला हा निर्णय निश्चितच ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो महिलांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारा ठरेल. महिलांच्या श्रमाला योग्य न्याय देत त्यांना स्वाभिमानाने 'शेतकरी' म्हणून ओळख मिळवून देणारे हे विधेयक महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास आ. डॉ. आशिषराव देशमुख यांनी व्यक्त केला.

थोडक्यात

## आमगावचे नवनियुक्त पोलीस निरीक्षकांचा पोलीस पाटील संघटनेकडून सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांचा पोलीस पाटील संघटनेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पोलीस प्रशासन आणि पोलीस पाटील यांच्यात समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आमगाव पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक निळकंठ कुकडे यांच्या पदग्रहणानिमित्त पोलीस पाटील संघटनेच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलीस निरीक्षकांनी पोलीस पाटील हे ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाचे महत्त्वाचे दुवा असल्याचे सांगितले.गुन्हेगारीवर नियंत्रण, सामाजिक सलोखा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस पाटील व पोलीस प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही पोलीस प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही देत गावपातळीवरील विविध प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्तपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी पोलीस पाटील संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष नर्मदा चुटे, तालुका अध्यक्ष सुरेश कोरे, किशोर दोनोडे, प्रदीप चुटे, गिरधारी राहिले, अशोक भांडारकर, प्रदीप बावनथडे, संजय पुंड, सुलोचना बहेकार, सरिता मेंढे तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

## राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने ठाणे येथील तुषार नर्सिंग होममधील डॉक्टर्स सन्मानित



**दै. सिंहवाणी वृत्त, ठाणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**

'ऋग्णसेवा हीच ईश्वर सेवा' असे मानत रुग्णांच्या रात्रं दिवस तत्पर असणाऱ्या सर्व डॉक्टर बंधू भगिनींना १जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !याच डॉक्टर दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेने घोडबंदर रोड, कापुरबावडी नाका, ठाणे पश्चिम येथील डॉ.संदीप कदम यांच्या तुषार नर्सिंग होम मधील बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, पॅथॉलॉजिस्ट, जनरल व लॅप्रोस्कोपी सर्जन, फिजिशियन व डायबेटोलॉजिस्ट, फिजिओथेरापीस्ट, पीडियाट्रिक सर्जन, त्वचारोग तज्ज्ञ, प्लास्टिक सर्जन अशा वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तीमत्वांना संस्थेच्यावतीने 'कृतज्ञता प्रमाणपत्र' प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी विजय चव्हाण(कार्याध्यक्ष-ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, विभागप्रमुख-उबाठा गट),आरती भार्ज (समुपदेशक, ध्यान प्रशिक्षक, लेखिका, व्याख्यात्या, सामाजिक संस्था व्यवस्थापक), छाया गचके(खजिनदार-महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ), मानसी मोने(खजिनदार-सेवा समाधान फाऊंडेशन, समाजसेविका), मनमोहन रोगे(कवी, जेष्ठ वृत्तपत्र लेखक) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.डॉ.संदीप कदम यांनी आपल्या व्यस्त शेड्युलमध्ये सुद्धा आमच्या संस्थेचा उपक्रमाला बराच वेळ दिला. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी विशेष आभार मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

## पोलीस अधीक्षक कार्यालय गोंदिया येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंभरे**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णायन्वये सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ति संत व समाजसुधारक यांची जयंती शासकिय कार्यालयात साजरी करण्यात यावी असे निर्देश आहे. त्याअनुषंगाने दिनांक १ जुलै २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय गोंदिया येथे मा. श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्या शुभ हस्ते वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमात पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्यासह रामदास शेवते प्रभारी पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.) गोंदिया तसेच गोंदिया पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/अंमलदार व मंत्रालयीन स्टाफ हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या 'लाईट वॉरियर्स'चा लढा !

## पावसाळी आव्हाने, अखंडित वीजसेवेसाठी रात्रंदिवस 'फिल्ड'वर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पावसाळा सुरू झाला की निसगार्चे रूप विलोभनीय होते, मात्र याच काळात महावितरणच्या यंत्रणेसाठी अग्निपरीक्षेचा काळ सुरू होतो. सोसाट्याचे वारे, मुसळधार पाऊस आणि निसर्गाची अनिश्चितता यामुळे वीज पुरवठा खंडित होण्याच्या तक्रारी वाढतात. ग्राहकांना होणारा हा त्रास कमी करण्यासाठी आणि तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी, ज्यांना आपण आदरपूर्वक ह्यलाईट वॉरियर्सह्न म्हणू शकतो, ते रात्रंदिवस चिखल-पाण्याशी झुंज देत आहेत.



**वीज का जाते ?**

तांत्रिक गुंतागुंत समजून घेणे गरजेचेः पावसाळ्यात वीज पुरवठा खंडित होण्यामागे अनेक नैसर्गिक आणि तांत्रिक कारणे असतात. सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे वीज वाहिन्यांवर झाडांच्या फांद्या कोसळणे, ही वीज जाण्यामागची सर्वात मोठी समस्या आहे. यामुळे वीज वाहिनी तुटणे किंवा शॉर्ट सर्किट होण्याचे प्रमाण वाढते. याव्यतिरिक्त, सातत्यपूर्ण पावसामुळे हवेतील आर्द्रता वाढते, ज्याचा थेट परिणाम ट्रान्सफॉर्मर आणि इतर उपकरणांच्या इन्सुलेशनवर होतो. अनेक ठिकाणी ओलाव्यामुळे वीज गळती (लीकेज) होऊन सुरक्षिततेसाठी यंत्रणा आपोआप ट्रिप होते. तसेच, माती भुसभुशीत झाल्याने खांब झुकणे किंवा वितरण पेटीत पाणी शिरणे, यांसारख्या तांत्रिक समस्याही उद्भवतात. या परिस्थितीमध्ये संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी महावितरणला खबरदारीचा उपाय म्हणून वीज पुरवठा काही काळासाठी बंद ठेवावा लागतो.

**अहोरात्र संघर्ष, 'लाईट वॉरियर्स'ची जिद्दः**

विजेचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा लढा कौतुकास्पद आहे. पावसाळ्यापूर्वीच महावितरणने प्री-मॉन्सून देखभाल व दुरुस्तीची मोहीम राबवून झाडांच्या फांद्या छाटणे, अर्थिंग तपासणे आणि जुन्या वाहिन्या बदलण्याचे काम पूर्ण केलेले असते. तरीही, पावसाच्या तीव्रतेत नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास हे कर्मचारी पावसाची तमा न बाळगता प्रत्यक्ष कामावर हजर होतात. चिखल-पाण्यातून मार्ग काढत, कडाक्याच्या थंडीत खांबावर चढून दुरुस्ती करणे हे काम अत्यंत जोखमीचे असते. रात्रीच्या वेळी अंधारात आणि पावसात काम करताना अनेकदा जीवघेण्या परिस्थितीचाही त्यांना सामना करावा लागतो, मात्र ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी हे कर्मचारी न थकता काम करत असतात.

**ग्राहकांसाठी मार्गदर्शक सूचना आणि आवाहनः** वीज पुरवठा खंडित झाल्यास ग्राहकांनी घाबरून न जाता संयम राखणे आवश्यक आहे.

**तपासणीः** सर्वप्रथम आपल्या घरातील मेन स्विच किंवा 'MCB' तपासा. समस्या कायम असल्यास आपल्या शेजाऱ्यांच्या घरी वीज आहे का याची विचारणा करा.

**सुरक्षितता**

पावसाळ्यात ओल्या हाताने स्विचला हात लावू नका. रस्त्यावरील वीज खांब किंवा तुटलेल्या वीज वाहिन्यांपासून सुरक्षित अंतर राखा. वीज गेल्यावर टीव्ही, फ्रिज यांसारखी संवेदनशील उपकरणे अनप्लग करून ठेवा, जेणेकरून वीज पुन्हा येताना होणाऱ्या व्होल्टेज फ्लक्च्युएशनपासून त्यांचे रक्षण होईल.

महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक सांगतात की, "आमची यंत्रणा पावसाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी सज्ज आहे. ढगफुटीसदृश पाऊस किंवा झाडे पडल्याच्या घटनांमध्ये दुरुस्तीस वेळ लागू शकतो.

अशा कठीण परिस्थितीत ग्राहकांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. अधिकृत माहितीसाठी सोशल मीडियावरील अफवांकडे दुर्लक्ष करून महावितरणच्या एसएमएस अलर्टवर किंवा अधिकृत कार्यालयातील सूचनेवरच विश्वास ठेवा."सुरक्षित आणि सतर्क राहा; महावितरणचे लाईट वॉरियर्स अखंडित सेवेसाठी सदैव तत्पर आहेत!

**संपर्क करण्यासाठी**

महावितरण मोबाईल अँप आणि www.mahadiscom.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून तुम्ही घरबसल्या तक्रार नोंदवून तिचा 'स्टेटस' ट्रॅक करू शकता. तसेच तक्रार नोंदवण्यासाठी महावितरणच्या १९१२ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १८००२-२१२-३४३५ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधा. ज्या ग्राहकांनी आपले मोबाईल नंबर महावितरणकडे नोंदणीकृत केले आहेत, ते ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस कॉल देऊ शकतात. किंवा, नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून "NOPOWER [ग्राहक क्रमांक]" असा संदेश टाइप करून ९९३०३९९३०३ या क्रमांकावर पाठविल्यास वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार नोंदविली जाईल आणि ग्राहकाला त्याची माहिती देणारा संदेश प्राप्त होईल.

## पेन्शन घोटाळा संदर्भात मनपातर्फे प्रसिद्ध बातमीचा खुलासा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महानगरपालिकेतील दि. ०१/११/२००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कार्यरत अधिकारी/ कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १९/०८/२०१९ नुसार दिनांक ०१/०४/२०१९ पासून मनपा हिस्सा १० टक्के वरुन १४ टक्के करण्यात यावा असे निर्देश होते. त्यानुसार सदर बाब धोरणात्मक स्वरुपांची असल्याने ऑगस्ट २०२१ मध्ये तत्कालीन मा. आयुक्त यांच्यामार्फत सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यासंदर्भात वित्त विभागामार्फत नस्ती सादर करण्यात आलेली होती. तथापि सदर बाबीस तत्कालीन मा. आयुक्त यांची मंजूरी प्राप्त झाली नाही. तद्नंतर शासन निर्णय नगर विकास विभाग दिनांक २२/०२/२०२२ नुसार सप्टेंबर २०२४ मध्ये तत्कालीन मा. आयुक्त यांचेकडे मनपा हिस्सा १० टक्के वरुन १४ टक्के करण्याबाबत नस्ती पुनश्च सादर केली असता, सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यावर सादर करावे. तोपर्यंत १० टक्के अंशदान सुरु ठेवावे असे मा. आयुक्त यांनी निर्देशित केले. वरील प्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यावर पुनश्च नस्ती सादर करण्यांत आली असता मनपाच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन तत्कालीन मा. आयुक्त/ प्रशासक यांनी ठराव क्रमांक ८२/ मनपा/ प्रशासक, दिनांक ०६/१२/२०२५ नुसार मनपाचा (सहभाग) अंशदान दि. ०१/०४/२०२५ पासून १० टक्के वरुन १४ टक्के करण्याबाबत मंजूरी प्रदान केली त्यानुसार सद्यास्थितीत कार्यवाही सुरु आहे. उपरोक्तपणे मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेण्यात आलेला असून, यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक घोटाळा झालेला नाही, असे या खुलास्याव्दारे कळविण्यात आले आहे.

## नायब तहसीलदारांनी जप्त केला अवैध रेती भरलेला टिप्पर

### विना रायल्टीने रेती भरलेला ट्रक, अवैध रेती माफीयाचे धागे दणाणले

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**

गोंदिया जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी महसूल देवरी अंतर्गत सालेकसा तहसील कार्यालय मार्फत ३० जून रोजी दुपारी दोन वाजे दरम्यान भजेपार येथून परत असताना गडमाता चौक सालेकसा समोर वाहन चालकाचे नाव दुशांत बोहरे राहणार आमगाव यांचे गाडी नंबर.MH.49.CT-9087.



अंदाजे सहा ब्रास विनापरवाना अवैध रेती जात असलेला १२ चाकी ट्रकला थांबवले असता त्यांच्याकडे कुठल्याही परवाना नसल्याची बाब उघडकीस आली आहे.

सदर रेतीही अवैध प्रमाणात चालवून जनसामान्य माणसाची दिशाभूल करून मोठ्या प्रमाणावर अधिक पैसे घेत आहेत त्यामुळे रेतीमाफी यांचा धुमाकूळ वाढलेला होता व सैराटही झाले होते तसेच अवैध रेती माफिया हे लोकांकडून अधिकचे पैसे घेऊन मालामाल झालेले आहेत. सदर अवैध रेती असल्याचे नायब तहसीलदार व विद्यमान प्रभारी तहसीलदार अमृता सुतार यांनी जप्ती व बयानात नोंद केली आहे. प्राप्त माहितीनुसार ड्रायव्हर हे सालेकशा तालुक्यातील बोदलबोडी येथील सचिन देवराज पटले असल्याचे जप्तीनाम्यात नमूद केले आहे असाच प्रकार अवैध रेती तस्करी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे व सालेकसा तालुक्यात आजही बोदलबोडी धानोली पिपरटोला व इतर गावातही मोठ्या प्रमाणावर रेती तस्करी सुट्टीच्या दिवशी अधिक होत असल्याची बाब उघडकीस आली असून पावसाळापूर्वीच अवैध रेती साठाही वन विभागाच्या जागेवर व इतरही महसूल विभागाच्या जागेवर साठा करून ठेवलेला आहे.

यात वनसंपदा ही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे व पावसाळ्यात अवैध रेती चे अधिक पैसे घेऊन लाभार्थ्यांची ही आर्थिक पिळवणूक केली जात आहे. या १२ चाकी ट्रक ला थांबवून सदर प्रकरण हा तहसीलदार अमृता सुतार यांच्या मार्गदर्शनात खाली पिपरीयाचे ग्राम महसूल अधिकारी.टी एच डोये हे सुद्धा उपस्थित होते.

विद्यमान तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले हे अर्जित रजेवर गेल्याची माहिती आहे व याचाच फायदा अवैध रेती माफीयांना झाला व ते सुट्टीवर गेल्याचे माहित झाल्याने अधिकच अवैध रेती माफिया हे सैराट झाले होते त्याचा फायदा घेत पुन्हा दिवसाढवळ्या व रात्रीच्या वेळेस अवैध रेती चोरीला जात आहे. यामध्ये सालेकसा तालुक्यातील काही ग्राम महसूल अधिकारी एजंट व अवैध रेती माफिया सोबत संगणमत करून दलालही असल्याची बाब उघडकीस आली आहे.

मात्र तो दलाल ग्राम महसूल अधिकारी तलाठी कोण असा संतप्त सवालही आता जनतेकडून येऊ लागला आहे. अशा दलाल व एजंटगिरी करणाऱ्या तलाठ्यांची तात्काळ मालमत्तेची सखोल चौकशी व्हावी व त्यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात यावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. तसेच बऱ्याच ट्रॅक्टर ड्रायव्हर कडे लायसन्स नाही तर काही ट्रॅक्टरचे ड्रायव्हर विना लायसननेच ड्रायव्हर ट्रॅक्टर सहा चाकी दहा चाकी बारा चाकी चालवीत आहेत याकडे सुद्धा लक्ष द्यावे.

या संदर्भात अधिक सविस्तर माहिती विचारली असता आपण बारा चाकी ट्रक अवैध रेतीचा पकडलेला आहे व तहसील कार्यालय सालेकसा येथे जमा केला असून याविषयी अहवाल उपविभागीय अधिकारी महसूल देवरी यांच्याकडे पाठविला जाईल

**- अमृता सुतार प्रभारी तहसीलदार, सालेकसा**

## अमरावतीत हलबा जमातीचे महाचर्चा सत्र संपन्न, पुढील वाटचालीसाठी कृती आराखडा निश्चित



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

राष्ट्रीय हलबा जमात महामंडळ, गडचिरोली यांच्या पुढाकाराने तसेच आदिवासी हलबा-हलबी उत्कर्ष मंडळ, अमरावती यांच्या सहकार्याने संत गाडगे महाराज सभागृह, अमरावती येथे "उच्च न्यायालयाच्या निरीक्षणानुसार 'कोष्टी' हा व्यवसायवाचक शब्द असून, त्या अनुषंगाने हलबा जमातीची पुढील दिशा" या विषयावर राष्ट्रीय महाचर्चा सत्र उत्साहात पार पडले.

या महाचर्चेत केवळ न्यायालयीन निरीक्षणापुरतीच चर्चा मर्यादित न राहता, हलबा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, कायदेशीर आणि संघटनात्मक प्रश्न तसेच भविष्यातील दिशा यावर अभ्यासपूर्ण व सखोल विचारमंथन करण्यात आले. हलबा जमातीच्या हक्कांच्या लढ्याला नवी दिशा देणारा आशावादी मार्ग या चर्चेतून समोर आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अभ्यासक शरद सोनकुसरे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. दीपक केदार, नाशिक येथील ज्येष्ठ अभ्यासक नितीन नागपूरे तसेच राष्ट्रीय हलबा जमात महामंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय धकाते यांचा समावेश होता.

महाचर्चेत नितीन नागपूरे, डॉ. दीपक केदार, कृष्णा चांदेकर (नागपूर), श्याम सोनकुसळे (मुंबई), राजेंद्र नंदनवार (नाशिक), अँड. प्रशांत राईकवार (अचलपूर), राकेश कुंभारे(मुंबई), प्रशांत सिलेकर(नागपूर), देवराव देवघरे(मुंबई), राजाभाऊ पराते(अमरावती), सुधाकर कोसराबे(कल्याण), राजेंद्र बोकडे(भुसावळ), महादेव कुंभारे आदींनी आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले.

चर्चेनंतर हलबा समाजाच्या भविष्यातील संघटनात्मक वाटचालीसाठी कृती आराखडा निश्चित करण्यात आला. तसेच कार्यकारिणीचा विस्तार करून विविध समित्यांवर सक्रिय कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राकेश कुंभारे यांनी केले, तर विषयाची भूमिका राष्ट्रीय अध्यक्ष तथा आयोजक उदय धकाते यांनी मांडली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व विजय रणदिवे आणि आभार विजय धार्मिक यांनी केले.

या महाचर्चेला राज्यातील विविध भागांतून हलबा समाजाच्या संघटनांचे पदाधिकारी, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला प्रतिनिधी सुचिता धकाते, ज्योती चांदेकर, अश्विनी सहारकर, चंदा हेडाऊ, चित्रा कोहाडे, सौ. राईकवार यांच्यासह १०० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व विजय रणदिवे आणि आभार विजय धार्मिक यांनी केले.

# महाराष्ट्र बँकेच्या शाखा व्यवस्थापकाची मनमर्जी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा -प्रकाश टेंभरे**

तालुका अतिदुर्ग महाराष्ट्राच्या टोकावर वसलेला असून या भागात मजूर वर्ग जास्त प्रमाणात असल्यामुळे शेतीचे काम करून आपली उपजीविका करतात आता पावसाळा सुरू झाला व सर्व शेतकरी आपल्या शेतीत बियाणे व व खत घेण्यासाठी पीक कर्ज किंवा सोनेतारण साठी बॅंकांचे धावपळ करीत आहेत.



तालुक्यात एक मात्र महाराष्ट्र बँक असून या बँकामध्ये शेतकरी मजूर जास्त ग्राहक आहेत. ज्या शेतकऱ्यांना खूप अडचण असल्यामुळे आपले दागदागिने गहाण ठेवण्यासाठी बँकामध्ये जातात परंतु इथले बँक शाखा व्यवस्थापक आदित्यसेट शेतकऱ्यांना उडवाउढीचे उत्तर देऊन टाळाटाळ करतात व भूलथापा देऊन शेतकऱ्यांना त्रास देतात शेतकरी बँक व्यवस्थापकाच्या त्रासाला कंटाळून हवे त सावकाराकडे जातात व त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक व्याज देऊन खूप त्रास भोगावे लागतो एकीकडे जनप्रतिनिधी शेतकऱ्यांची कैवारी म्हणतात फक्त वोट घेण्यापुरतेच आमिष देऊन वोट घेतल्यानंतर, हम तो ठहरे परदेसी साथ कहा निभायेंगे, प्रमाणे खुर्ची मिळाले कि विसरून जातात.

शेतकरी शेतात कष्ट करतो व आपल्या कामासाठी कार्यालयात जातो तिथं पण कष्टच सोसावे लागत आहे,सर्व विभागात शेतकऱ्यांनाच इकडे तिकडे पळापळ करून जैसे थे त्याच स्थिती राहतात तालुक्यातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र बँकचे व्यवस्थापक आदित्यसेट यांच्यावर कारवाई करावे अशी तक्रार केली आहे.

लाखो रुपयाची भाड्याच्या घरात असलेली बँक ऑफ महाराष्ट्र इमारत कार्यरत आहे. मात्र गेल्या अनेक दिवसापासून बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचा फलकच बेपत्ता झाला असून ही बँक आहे की घर आहे हे सुद्धा अजूनही कोडेच म्हणावे लागेल. स्थानिक शाखा व्यवस्थापकांनी त्वरित फलकाची पर्यायी व्यवस्था करावी.